उदगीर/प्रतिनिधी - महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील ग्रंथालयात ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस.आर.रंगनाथन यांची जयंती साजरी करण्यात आली. डॉ. रंगनाथन यांची जयंती जगभर ग्रंथालय दिन म्हणून साजरी केली जाते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.कणकुरे के.बी. होते मंचावर प्रा.डॉ.एस.आर. नागोरी, प्रा.डॉ.हमीद अश्रफ, प्रा. मल्लेश झुंगा स्वामी यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ.कणकुरे म्हणाले विद्यार्थी जीवनात वाचनाविषयी महत्व सांगून, महाविद्यालयातील समृध्द ग्रंथालयाचा लाभ घेण्याचे आवाहन केले. ग्रंथपाल प्रा.एल.बी. पेन्सलदार यांनी महाविद्यालयीन ग्रंथालय सेवेची माहिती देवून वाचक प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना काम व कसे वाचावे याविषयी माहिती दिली. सूत्रसंचलन प्रा.जी.जी. जवळीकर यांनी केले.


# प्रा. आजराशीरिन जहागीरदार नेट परीक्षा उत्तीर्ण

उदगीर/प्रतिनिधी - महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील उर्दू विभागातील प्रा.आजराशीरिन जहागीरदार ह्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वतीने डिसें. २०१४ मध्ये घेण्यात आलेल्या उर्दू विषयातील राष्ट्रीय पात्रता चाचणी(नेट) परीक्षा जेआरएफसह उत्तीर्ण झाल्या आहेत. यशाबद्दल प्राचार्य डॉ.के.बी. कणकुरे, उपप्राचार्य डॉ.एस.जी.पाटील, विभाग प्रमुख प्रा.डॉ. हमीद अश्रफ, प्रा.डॉ. मकबूल अहमद, ॲड. मोहमंद वसीम यांनी अभिनंदन केले. उडकनूर-दि.१९-८-१५-

उडकनूर. दि. 19-8-15.

| Sr no. 12 | **Event Name:** National seminar on the comparative study of Dalit autobiographies | **No of Beneficiaries:** 160 | **Organizing Department:** UGC and department of Hindi | **Date and Duration:** 24 and 25 August 2015 |
|---|---|---|---|---|

| **Event Objectives/ Outcomes :** | **Chief Guest/Resource Person:** |
|---|---|
| • a two day National seminar on the comparative study of of dalit auto was organised jointly bye by the department of Hindi and the affiliating university sponsored by the UGC<br>• the participants from the state and outside the state participated in this seminar the vice chancellor of the affiliating university was the inaugurator for this seminar | Dr Surya Narayan Ransubhe |



एकजूट

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात २४ ऑगस्टला राष्ट्रीय चर्चासत्र

उदगीर/प्रतिनिधी- महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात हिंदी विभाग आणि विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने २४ व २५ ऑगस्ट २०१५ रोजी हिंदी मराठी दलित आत्मकथनाचा तुलनात्मक अभ्यास या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

२४ ऑगस्ट २०१५ रोजी सकाळी ११ वा. उद्घाटन होणार असून अध्यस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ.शिवराज नाकाडे राहणार आहेत. उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे कुलगुरू डॉ.पंडित विद्यासागर, यांच्या हस्ते, डॉ.सुर्यनारायण रणसुभे(लातूर) यांचे बीजभाषण होईल. प्रमुख पाहुणे शरणकुमार लिंबाळे (नाशीक) ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी प्राचार्य डॉ.सुरेश सदावर्ते, हिंदी अभ्यास मंडळाने अध्यक्ष डॉ.ए. एच. जमादार, सदस्य डॉ.संजय गडपायले, संस्था उपाध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर यांच्या उपस्थितीत होईल.

२५ ऑगस्ट २०१५ रोजी दु. २.३० वा. संस्थेचे उपाध्यक्ष प्रा.मनोहर पटवारी, विद्यालय महाविद्यालय, धारवाडाचे डॉ.सुरेश मुळे, नांदेड विद्यापीठाचे महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ संचालक, डॉ.दीपक पानसकर, माजी विभाग प्रमुख प्रा.डॉ. नरसिंहप्रसाद दुबे, दयानंद महाविद्यालय लातूर प्राचार्य डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन, संस्थासचिव ॲड. अजय दंडवते यांच्या उपस्थितीत समारोप होणार आहे.

चर्चासत्रास उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ.के.बी. कणकुरे, विभागप्रमुख प्रा.डॉ. एम.एम.कप्पीकेरे, संयोजक, प्रा.डॉ.बी.एम.भुक्तरे यांनी केले आहे.

०००

एकजूट

दि.२२–०८–२०१५

<table>
<tr>
<td>Sr no. 13</td>
<td>Event Name:<br>induction program for students and welcome function</td>
<td>No of Beneficiaries:<br>130</td>
<td>Organizing Department:<br><br>department of geography</td>
<td>Date and Duration:<br>one day duration</td>
</tr>
<tr>
<td colspan="4">Event Objectives/ Outcomes :<ul><li>the department of Geography organised the induction program in the form of welcome function for the newly admitted students of undergraduate course</li><li>students were guided on the code of conduct the various student support facilities and the career opportunities for the studentsand various other facilities available in the college</li></ul></td>
<td>Chief Guest/Resource Person:<br>Dr Rahul Allapure</td>
</tr>
</table>



## उदयगिरीत स्वागत समारंभ व भुगोल अभ्यास मंडळाचे उद्घाटन

**उदगीर(प्रतिनिधी)** येथील उदयगिरी महाविद्यालयातील नुतन प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ आयोजीत करण्यात आला होता. त्यात बी.ए.प्रथम वर्ष व एम.ए.प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ व भुगोल अभ्यास मंडळाचे उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमाचे औचित्य साधुन भुगोल विभागातील निवृत्त प्राध्यापिका प्रा.सौ.डी.बी. सोनकांबळे यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.के.बी.कणकुरे उपस्थित होते प्रमुख पाहुणे व उद्घाटक म्हणुन महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ.राहुल अलापुरे उपस्थित होते विद्यार्थ्यांनी स्तःचा सर्वांगीण विकास कशा पद्धतीने साध्य करावा या संदर्भात प्रमुख पाहुणे डॉ.अलापुरे मार्गदर्शन केले तसेच प्रा.सौ.डी.बी. सोनकांबळे, यांनी विद्यार्थ्यांना या प्रसंगी मार्गदर्शन केले त्याचबरोबर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.के.बी. कणकुरे यांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व वृद्धींगत करण्याचे पैलु सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभाग प्रमुख डॉ. एम.पी.मानकरी तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा.सौ. [illegible] व आभार डॉ.ए.यु.नागरगोजे यांनी मानले कार्यक्रमाचे सुत्रसंचलन बी.ए.द्वितीय वर्षाचा विद्यार्थी शेळके यांनी केले.

21 August 2015

# २४ ऑगस्टला उदयगिरित राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

**उदगीर(प्रतिनिधी)** महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात हिंदी विभाग आणि विद्यापीठ अनुदान आयोजन नवी दिल्ली व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने २४ व २५ ऑगस्ट २०१५ रोजी हिंदी मराठीदलित आत्मकथनाचा तुलनात्मक अभ्यास या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे .

२४ ऑगस्ट २०१५ रोजी सकाळी ११ वाजता उद्घाटन होणार असून अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ.शिवराज नाकाडे राहणर आहेत उद्घाटन स्वामीरामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, यांच्या हस्ते डॉ.शरणकुमार लिंबाळे (नाशिक) ज्ञानोपासक महाविद्यालय परभणी प्राचार्य डॉ.सुरेश सदावर्ते, हिंदी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. ए.एच.जमादार, सदस्य डॉ.संजय गडपायले उपाध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, यांच्या उपस्थितीत होईल २५ ऑगस्ट २०१५ रोजी दुपारी २.३० वाजता संस्थेचे उपाध्यक्ष प्रा.मनोहरराव पटवारी, विद्यालय महाविद्यालय, धारवाडचे डॉ.सुरेश मुळे, नांदेड विद्यापीठाचे महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ संचालक डॉ.दिपक पानसकर, माजी विभागप्रमुख प्रा.डॉ.नरसिंहप्रसाद दुबे, दयानंद महाविद्यालय लातुर प्राचार्य डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन संस्थासचिव ॲड.चर्चासत्रास उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ.के.बी.कणकुरे, विभागप्रमुख प्रा.डॉ.एम.एस. कप्पीकरे, संयोजक प्रा.डॉ.बी. एस.भुक्तरे यांनी केले आहे

यशवंत. दि. 21-8-15.

# दलित आत्मचरित्रे अनुभवाचे साहित्य:डॉ. पंडित विद्यासागर

यशवंत

दि. २५ ऑगस्ट २०१५



**उदगीर(प्रतिनिधी)** पुर्वीच्या साहित्यात कल्पनेला वाव होता पण दलित साहित्याच्या प्रवेशाने साहित्याचे मापदंड बदलले. दलित आत्मचरित्रे अनुभवावर आधारित वास्तववादी साहित्य असल्याचे मत नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पंडित विद्यासगर यांनी केले. महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी विभागातर्फे आयोजित हिंदी मराठी दलित आत्मकथांचा तुलनात्मक अभ्यास या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चा सत्र उद्घाटन प्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष डॉ. शिवराज नाकाडे होते. मंचावर सचिव अॅड. अजय दंडवते, कोषाध्यक्ष महादेव नौबादे, सदस्य अॅड. रामचंद्रराव येरमे, प्रा. आडेप्पा अंजूरे, हिन्दी अभ्यास मंडळ सदस्य डॉ. संजय गडपायले, प्राचार्य डॉ. के.बी. कणकुरे, उपप्राचार्य डॉ. एस.जी. पाटील, विभागप्रमुख प्रा.डॉ. एम.एस.कप्पीकेरे, संयोजक प्रा.डॉ. बी.एस.भुक्तरे, बीजभाष्मक सुप्रसिध्द समीक्षक डॉ.सूर्यनारायण रणसुभे यांची उपस्थिती होती. डॉ. रणसुभे म्हणाले साहित्यात तुलनात्मक अभ्यास काळाची गरज आहे. प्रत्येक ज्ञानखखेत विचाराची देवाण घेवाण होते. साहित्यकृती कळण्यासाठी बहुश्रुतता येणे आवश्यक आहे. डॉ. नाकाडे म्हणाले साहित्यातून नितीमूल्यांचे संस्कार केले जातात. साहित्य परिवर्तनात महत्वाची भूमिका बजावू शकते. चारित्र्या निर्माण हा साहित्याचा मुख्य हेतु आहे. महाविद्यालयाचा परिचय व प्रास्ताविक डॉ. कणकुरे यांनी केले. चर्चासत्र आयोजना मागची भूमिका डॉ. भुक्तरे यांनी विषद केली. आभार प्रा.डॉ. राजकुमार मस्के यांनी मानले.

दि. 25-8-2015 यशवंत

| Sr no. 14 | **Event Name:** workshop on womens laws | **No of Beneficiaries:** 110 | **Organizing Department:** Maharashtra udaygiri Mahavidyalaya state women's Commission and Latur district police | **Date and Duration:** 26 August 2015 |
|---|---|---|---|---|
| **Event Objectives/ Outcomes :**<br>● this workshop was jointly organised by Latur district police and state women Commission in order to create awareness among the girls students of the college about the legal provisions for women<br>● this workshop was organised as a part of gender sensitization Action Plan of the college.the resource persons guided the girls students on various legal provisions for women | | | | **Chief Guest/Resource Person:**<br>Asha Bhise<br>Varsha Dandi me |

यशवंत. दि. २६-८-२०१५.

# महाराष्ट्र उदयगीरी महाविद्यालयात महिला कायदा कार्यशाळा



उदगीर (प्रतिनिधी) महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात राज्य महिला आयोग, लातूर जिल्हा पोलिस दल यांच्या विद्यमाने महिला संबंधी सायबर क्राईम प्रतिबंधक कायदा या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. कार्यशाळेत राज्य महिला आयोगाच्या सदस्या सौ. आशा भिसे, सहाय्यक पोलिस निरीक्षक वर्षा दंडिमे (लातूर ) यांनी विद्यार्थीनींला मार्गदर्शन केले.

अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष डॉ. शिवराज नाकाडे होते. मंचावर संस्था उपाध्यक्ष प्रा. मनोहरराव पटवारी, सदस्य सिध्देश्वर पाटील, प्राचार्य डॉ. के.बी.कणकुरे, प्रा. डॉ. एस.आर नागोरी, प्रा. एस.जी. अन्सारी, प्रा. एस.एस. पाटील, प्रा. एम.बी. स्वामी, प्रा. डॉ. राजकुमार मस्के यांची उपस्थिती होती. उदगीर तालुक्यातील शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थीनीची दक्षता पथके तयार करावीत व या सर्व तालुकातील पथकांचा समन्वय उदयगिरी महाविद्यायाने करुन या कामाला गती द्यावी असे ठरविण्यात आले.

यशवंत. दि. २६-८-२०१५.

# महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्राची सांगता

**उदगीर(प्रतिनिधी)** महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात हिन्दी विभाग व विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय हिन्दी मराठी दलित आत्मकथांचा तुलनात्मक अभ्यास या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राचा समारोप झाला. अध्यक्षस्थानी संस्था उपाध्यक्ष प्रा. मनोहरराव पटवारी होते. मंचावर दयानंद कला महाविद्यालय, लातूरचे प्रभारी प्राचार्य डॉ. जोगेंद्र सिंह बिसेन, माजी विभागप्रमुख प्रा.डॉ. नरसिंह प्रसाद दुबे, विद्यारण्य महाविद्यालय, धारवाडचे डॉ. सुरेश मुळे, प्राचार्य डॉ. के.बी. करणकुरे, विभागप्रमुख प्रा.डॉ. एम.एस.कप्पीकेरे, प्रा.डॉ. बी.एस.भुक्तरे (संयोजक) यांची उपस्थिती होती.

दोन दिवस चांगली चर्चा, विचाराची देवाणघेवाण, उत्तम आदरातिथ्य झाल्याची प्रतिक्रिया प्रा.डॉ. पुष्पलता अग्रवाल, प्रा.डॉ. अनिल कांबळे, प्रा. शिवशेटे यांनी दिली. डॉ. बिसेन म्हणाले जे भोगले ते आत्मकथेत मांडले जाते. मराठी दलित आत्मकथा समृध्द आणि विकसित आहे. मनुष्य जोडण्याची प्रक्रिया साहित्याच्या माध्यमातून शिक्षकानी करावी. डॉ. दुबे म्हणाले चर्चासत्र नवे विचारांची ओळख झाली. ज्ञानात भर या चर्चासत्राने टाकली. प्रा. पटवारी म्हणाले ज्ञान अद्ययावत होण्यासाठी अशा चर्चासत्राची आवश्यकता आहे. येथ मिळालेले ज्ञान विद्यार्थ्यांत संक्रमित करावे. शिक्षकच समाजात आदर्श निर्माण करुन परिवर्तन करु शकतो. सूत्रसंचनल प्रा. प्रवीन जाहुरे यांनी केले. आभार प्रा.डॉ. बी. एस. भुक्तरे यांनी मानले.

यशवंत दि. २९-८-१५

यशवंत. दि. 29-8-2015

| **Sr no. 15** | **Event Name:** guest lecture on Kannada and Mahatma basweshwar | **No of Beneficiaries:** | **Organizing Department:** department of Kannada | **Date and Duration:** one day |
|---|---|---|---|---|
| **Event Objectives/ Outcomes :**<br>● the resource person delivered the guest lecture on the contribution of Mahatma basweshwar Kannada literature<br>● the biography and the work of of the head of the department of Kannad was also the part of this function | | | | **Chief Guest/Resource Person:** Shri Prabhurao Kamaliwale |



छायांकित वृत्त...

उदगीर येथील उदयगिरी महाविद्यालयात बुधवारी आयोजित व्याख्यानात प्रा. बालाजी ताडमल्ले यांनी मार्गदर्शन केले. यावेळी धर्मपूर नागशेट्टे आदी.

## उदयगिरी महाविद्यालयात व्याख्यान

उदगीर : शहरातील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात बुधवारी बिदरच्या प्रभुरावजी कांबळीवाले कन्नड सेवा प्रतिष्ठानच्या वतीने कन्नड विभागप्रमुख प्रा. डॉ. रमेश मूलगे यांच्या चरित्रावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी धर्मपूर नागशेट्टे होते. यावेळी प्रा. बालाजी ताडमल्ले यांनी महात्मा बसवेश्वर यांचे कार्य, कन्नड साहित्य व प्रा. डॉ. रमेश मूलगे यांच्याविषयी माहिती दिली. प्रास्ताविक प्रा. राजकुमार आलुरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. रघुशंक भातंब्रे यांनी केले. आभार एम. के मुधाळे यांनी मानले.

लोकमत दि 3-4-15

लोकमत. दि. 3-4-15

दि. 29-8-2015

पुण्यनगरी
लातूर

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना 'उदयगिरी'ने दिला मदतीचा हात !

उदगीर / प्रतिनिधी

सततच्या दुष्काळामुळे घायकुतीला आलेले मराठवाड्यातील शेकडो शेतकरी एकामागून एक आत्महत्येचा मार्ग अवलंबित असल्याने या शेतकऱ्यांची मुले पोरकी होत असताना शासनाला त्यांची कसलीच दया येत नाही. मात्र या परिस्थितीमुळे उदगीरच्या उदयगिरी महाविद्यालयाने मराठवाड्यातील शेकडो आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला-मुलींना इंजिनियरिंगपर्यंतचे शिक्षण निःशुल्क देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेत तसे आवाहनही केले आहे.

गेल्या तीन वर्षांपासून निसर्गाच्या लहरीपणाचा फटका सहन करणाऱ्या व सततच्या दुष्काळामुळे आर्थिक कणा मोडल्याने मराठवाड्यातील शेतकरी चांगलाच घायकुतीला आला आहे. घायकुतीला आलेले हे मराठवाड्यातील शेकडो शेतकरी एकामागून एक मृत्यूला कवटाळत आहेत. मात्र याचे राज्य व केंद्र शासनाला कसलेच सोयरसुतक नाही. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला-मुलींचे पालकत्व शासनाने स्वीकारून दया दाखवावी, अशी विनंती केली जात असताना शासन याकडे म्हणावे तेवढे गांभीर्याने पाहात नाही. मात्र, दुष्काळग्रस्त आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे सुतक उदगीरच्या महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीला पडले असून या शिक्षण संस्थेने दुष्काळाने होरपळलेल्या मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला-मुलींना संस्थेअंतर्गत चालणाऱ्या उदयगिरी इंजिनियरिंग कॉलेजमध्ये त्यांना निःशुल्क शिक्षण देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून तसा तो संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला-मुलींचे पालकत्व स्वीकारले असून इंजिनियरिंगचे शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांनी या महाविद्यालयात येऊन प्रवेश घ्यावा, असे आवाहन केले आहे.

> दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांनीही मोफत शिक्षण देऊ. आमच्या शिक्षणसंस्थेने मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना इंजिनियरिंगचे शिक्षण मोफत देण्याचा निर्णय तर घेतलाच आहे, पण दुष्काळग्रस्त मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या मुलांचीही इंजिनियरिंगचे शिक्षण घेण्याची इच्छा असेल तर त्यांनाही मोफत शिक्षण देऊ.
>
> **- प्रा. मनोहर पटवारी,** उपाध्यक्ष, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी

### मुलींच्या निवासाचीही मोफत सोय

मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना इंजिनियरिंगचे मोफत शिक्षण देण्याचा निर्णय जाहीर करणाऱ्या महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने इंजिनियरिंगचे शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या आत्महत्याग्रस्त व दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलींच्या निवासाची मोफत सोय करण्याचा निर्णय घेतला आहे.

### कुलगुरूंकडून निर्णयाचे स्वागत

स्वारातीम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांनी उदयगिरी महाविद्यालयाला नुकतीच भेट दिली. या भेटीत त्यांनी या संस्थेच्या या निर्णयाचे स्वागत केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. शिवराज नाकाडे, उपाध्यक्ष प्रा. मनोहर पटवारी, प्राचार्य डॉ. के. बी. कणकुरे उपस्थित होते.

पुण्यनगरी. दि. 29-8-2015.

| Sr no. 16 | Event Name: student Council elections | No of Beneficiaries: | Organizing Department: student Council | Date and Duration: 3rd September 2015 |
|---|---|---|---|---|

| Event Objectives/ Outcomes : | Chief Guest/Resource Person: |
|---|---|
| • The selection process for the student representatives from Among the class represent a Thieves was conducted on 3rd September 2015<br><br>• Pramod surnar the student of MSc Dairy Science 1st year was elected as the you are | student Council and the principal |




## उदयगिरीच्या विद्यापीठ प्रतिनिधी पदी प्रमोद सुरनर

उदगीर (प्रतिनिधी) महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात विद्यार्थी कल्याण मंडळाची स्थापना करण्यात येवून विद्यापीठ प्रतिनिधीपदी एम.एस्सी. दुग्धशास्त्र प्रथम वर्षात शिकणारा प्रमोद भाउराव सुरनर याची निवड झाली. प्राचार्य डॉ. के.बी.कणकुरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत महाविद्यालयाच्या सभागृहात निवड झाली. निवड प्रक्रिया पार पाडण्यासाठी प्रा.डॉ.आर. के. मस्के, प्रा. डॉ. आर. आर. तांबोळी, प्रा.डॉ. एस.आर.नागोरी, प्रा. डॉ. जे.एम पटवारी , प्रा. एम.बी. स्वामी, प्रा. एस.एस पाटील यांनी परिश्रम घेवून नवनियुक्त प्रतिनिधीचे अभिनंदन केले.

यशवंत- दि. 3-9-2015.

| Sr no. 17 | **Event Name:** youth parliament | **No of Beneficiaries:** | **Organizing Department:** Latur district police | **Date and Duration:** 1st September 2015 |
|---|---|---|---|---|
| **Event Objectives/ Outcomes :**<br>● this event was organised jointly e bi Maharashtra udaygiri Mahavidyalaya Udgir and Latur district police as a part of imbibing constitutional values social commitment and national integrity<br>● it was a competition in which Maharashtra udaygiri Mahavidyalaya stood first | | | | **Chief Guest/Resource Person:** Vishwas Nangare Patil |



# 'युवक सांसद'चे 'उदयगिरी'ला विजेतेपद


**लातूर / प्रतिनिधी**

लातूर जिल्हा पोलीस दलातर्फे सोमवारी (दि. ३१) आयोजित 'युवक सांसद विजेतेपद' या स्पर्धेत उदगिरच्या उदयगिरी महाविद्यालयाने प्रथम, लातुरातील राजर्षी शाहू महाविद्यालयाने द्वितीय आणि अहमदपूरच्या महात्मा गांधी महाविद्यालयाने तृतीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेतील उत्कृष्ट वक्ता म्हणून मुलांमध्ये महात्मा गांधी महाविद्यालयाचा तेजेश्वर शिंगडे व मुलींमध्ये रेणापूरच्या श्रीराम महाविद्यालयाची विद्यार्थिनी अरसुमयी राऊत यांची निवड करण्यात आली.

मार्केट यार्ड येथील दगडोजीराव देशमुख सभागृहात आयोजित या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी पोलीस अधीक्षक डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, बालरोग तज्ज्ञ डॉ. भातांब्रेकर, राज्य महिला आयोगाच्या सदस्य सौ. आशाताई भिसे, पत्रकार प्रदीप नणंदकर यांची उपस्थिती होती. या स्पर्धेत जिल्ह्यातील तालुकानिहाय दहा महाविद्यालयीन संघांचा सहभाग होता. महाविद्यालयीन स्पर्धकांनी नक्षलवाद, महिला सुरक्षितता, बालमजुरी, ज्येष्ठ नागरिक संबंधित मुद्दे, हुंडा प्रथा, स्त्री-पुरुष समानता, संवेदनशील सोशल मीडिया, युवकांची व्यसनाधिनता, भ्रष्टाचार, सामाजिक सलोखा, राष्ट्रउभारणीस युवकांची भूमिका, राष्ट्रीय एकात्मता या विषयांवर आपले विचार व्यक्त केले.

स्पर्धेचे मार्गदर्शक व प्रमुख तथा नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे पाटील यांच्या हस्ते स्पर्धेतील विजेत्यांचा स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अब्दुल गालीब शेख व ॲड. लता मोटे यांनी केले. आभार पोलीस निरीक्षक गजानन भातलवंडे यांनी मानले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी विजय कबाडे, मंगेश चव्हाण, डॉ. अश्विनी शेलार, गणेश किंद्रे, पोलीस निरीक्षक बालाजी सोनटक्के, कल्याण सुपेकर, दीपरत्न गायकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्यासह विद्यार्थी, नागरिक व कर्मचारी उपस्थित होते.

<table>
<tr><td>Sr no. 18</td><td>Event Name:<br>guest lecture on cohabitation of microbes</td><td>No of Beneficiaries:<br>48</td><td>Organizing Department:<br>staff prabodhini</td><td>Date and Duration:<br>7th September 2015</td></tr>
<tr><td colspan="4">Event Objectives/ Outcomes :<ul><li>Dr B M sandikar delivered a lecture on the cohabitation of the microbes under the flagship of staff prabodhini of the college</li><li></li></ul></td><td>Chief Guest/Resource Person:<br>dr b m sandikar</td></tr>
</table>



पुण्यनगरी. दि. ७-०९-२०१५

## महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय प्रथम

**उदगीर** – लातूर जिल्हा पोलीस प्रशासनातर्फे आयोजित युवक संसद स्पर्धेत उदगीर येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकाविला. संघात झेबा तांबोळी, छबा आवाळे, कविता आवाळे, रेशमा भोसले, व्यंकट बारमाळे आदींचा समावेश होता. विद्यार्थ्यांना प्रा. एम. बी. स्वामी, प्रा. एस. एन. सूर्यवंशी, प्रा. जी. जी. जेवळीकर यांचे मार्गदर्शन लाभले. यशाबद्दल संस्थाध्यक्ष डॉ. शिवराज नाकाडे, उपाध्यक्ष प्रा. मनोहरराव पटवारी, बसवराज पाटील नागराळकर, सचिव ॲड. अजय दंडवते, सहसचिव रामचंद्र तिरुके, कोषाध्यक्ष माधव नौपबदे, सिद्धेश्वर पाटील, प्राचार्य डॉ. के. बी. कणकुरे, उपप्राचार्य डॉ. एस. जी. पाटील, डॉ. आर. के. मस्के यांनी अभिनंदन केले.

## विद्यार्थी प्रतिनिधीपदी सुरनर

**उदगीर** – महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात विद्यार्थी कल्याण मंडळाची स्थापना करण्यात येऊन विद्यापीठ प्रतिनिधीपदी प्रमोद सुरनर, याची निवड प्राचार्य के. बी. कणकुरे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली. याबद्दल प्रा. डॉ. आर. के. मस्के, प्रा. डॉ. आर. आर. तांबोळी, प्रा. डॉ. एस. आर. नागोरी, प्रा. डॉ. जे. एम. पटवारी, प्रा. एम. बी. स्वामी, प्रा. एस. एस. पाटील यांनी अभिनंदन केले.

## प्रा. डॉ. संधीकर यांचे व्याख्यान

**उदगीर** – महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या सुक्ष्म जीवशास्त्र विभागातील प्रा. डॉ. बी. एन. संधीकर यांचे जीवांचे सहजीवन या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. एस. जी. पाटील होते. डॉ. संधीकर यांनी सूक्ष्म जीव म्हणजे डोळ्यांना न दिसणारे जीव. सूक्ष्म जीवांचे वनस्पती व मानवी जीवनात मोलाचे कार्य असल्याचे त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन डॉ. डी. आर. दहिफळे यांनी केले.

पुण्यनगरी. दि. 7-9-2015.

| Sr no. 19 | Event Name: Ozone day celebration | No of Beneficiaries: | Organizing Department: department of environment science and Deccan Urdu School Udgir | Date and Duration: one day 15 September 2015 |
|---|---|---|---|---|
| **Event Objectives/ Outcomes :**<br>● the resort guided the participants on the importance of ozone in the context of global warming and climate change<br>● the students participated in the PowerPoint presentation and various other environment awareness activities | | | | **Chief Guest/Resource Person:**<br>Dr JM Patwari |



महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालया तर्फे ओझोन दिवस साजरा

19-9-2015

उदगीर/प्रतिनिधी- महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या पर्यावरण शास्त्र विभाग व दख्खन उर्दू विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने जागतिक ओझोन दिवस दख्खन विद्यालयात साजरा करण्यात आला. मंचावर विभाग प्रमुख प्रा.डॉ.जे.एम. पटवारी, प्रा.डॉ. आर.के. नारखेडे, मु.अ. शेख हिसामोद्दीन यांची उपस्थिती होती. ओझोन वायू विषयी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन कु. देशमुख नियात फातिमा हिने केले. अंजली टिळेकर हिने पाणी प्रदूषणावर माहिती दिली. प्रा.डॉ.जे.एम. पटवारी म्हणाले ओझोन वायूचे मानवी जीवनात काय स्थान आहे याविषयी पर्यावरणी व दृष्टीकोनातून सखोल माहिती दिली.

शाहूरूट. दि. 19-9-2015.

उदयगिरी महाविद्यालयात ओझोन दिन साजरा

दि. 20-9-2015

उदगीर (प्रतिनिधी) येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचा पर्यावरण शास्त्र विभाग व दख्खन उर्दू विद्यलायालच्या संयुक्त विद्यमाने जागतिक ओ-झोन दिवस दख्खन विद्यालयात साजरा करण्यात आला. मंचावर विभाग प्रमुख प्रा.डॉ. जे.एम. पटवारी, प्रा. डॉ. आर.के.नारखेडे, मु.अ. शेख हिसामोद्दीन यांची उपस्थिती होती. ओझोन वायू विषयी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन कु. देशमुख नियात फातिमा हिने केले. अंजली टिळेकर हिने पाणी प्रदुषणावर माहिती दिली. प्रा.डॉ. जे.एम. पटवारी म्हणाले ओझ-ोन वायूचे मानवी जी-वनात कामस्थान आहे. या विषयी पर्यावरणीय दृष्टीकोनातून सखोल माहिती दिली.

यशवंत. दि. 20-9-2015.

<table>
<tr><td>Sr no. 20</td><td>Event Name:<br>death anniversary of Dr Verghese Kurien</td><td>No of Beneficiaries:</td><td>Organizing Department:<br><br>department of dairy science</td><td>Date and Duration:<br>one day March 2016</td></tr>
<tr><td colspan="4">Event Objectives/ Outcomes :<ul><li>the department of dairy science organised the death anniversary of vargis Kurien who contributed to the field of dairy production even though he was the mechanical engineer</li><li>he emphasised India ranks first globally e in dairy products due to the contribution of Dr Verghese Kurien from Gujarat this was the third death anniversary e off Dr Verghese Kurien</li></ul></td><td>Chief Guest/Resource Person:<br>Dr Ashok Davangere</td></tr>
</table>



**उदयगिरी महाविद्यालयात डॉ.वर्गिस कुरीयन यांचा तृतीय स्मृतीदिन साजरा**

उदगीर(प्रतिनिधी) धवल क्रांतीचे प्रणेते डॉ.व्हर्गीस कुरीयन यांना महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात डेअरीसायन्स विभागातर्फे त्यांचा तृतीय स्मृतीदिन साजरा करण्यात आला या प्रसंगी पशुवैद्यकीय महाविद्यालय उदगीर येथील डॉ. अशोक देवंगरे हे प्रमुख पाहुणे लाभले होते त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगीतले की, डॉ.व्हर्गीस कुरीयन हे मेकॉनिकल अभीयंता असू-नही त्यांनी दुग्धोत्पादन क्षेत्रात भरीव कामगिरी केल्यामुळे आज दुध उत्पादनात आपण पहिल्या क्रमांकारवर आहोत त्यांनी तयार केलेल्या भिती पत्रकाचे प्रकाशनही करण्यात आले अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.के.बी.कुणकुरे यंनिन सांगितले की. डॉ.व्हर्गीस कुरीयन म्हणजे गुजरातचा धवल पुरूष त्यांनी शेतकऱ्यांना विपरीत परिस्थितीवर मातकरून पशुपालनाकडे वळविले त्यामुळेच आज ऑस्ट्रेलिया, ब्राझील, नेदरलँड, या सारख्या विविध देशांच्या रांगेत आपण आहोत. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.अमोल होनकर यांनी तर आभार विद्यापीठ प्रतिनिधी प्रमोद सुरनर यांनी मानले. सद-रील कार्यक्रमास प्रा.मोरकीळे व्ही.एम.शिंदे अरविंद, प्रा.रंगवाळ तसेच कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयातील डेअरी सायन्सचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

यशवंत दि. 22-3-2015.

| Sr no. 21 | Event Name: tree plantation and celebration of environment day | No of Beneficiaries: | Organizing Department: department of environment science | Date and Duration: 5 June 2015 |
| --- | --- | --- | --- | --- |

| Event Objectives/ Outcomes : | Chief Guest/Resource Person: |
| --- | --- |
| • on the occasion of environment day the department of environment science organised the celebration and tree plantation programme<br>• the neem trees were planted in the campus on this occasion the principal and the head of the department expressed themselves on the importance of trees and environment conservation | the principal and the head of the department the department of environment science |



# उदयगिरीत पर्यावरण दिन साजरा

उदगीर./प्रतिनिधी- पर्यावरण दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात वृक्षारोपन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाच्या परिसरात कडुलिंब या वृक्षाचे रोपन करून त्याचे महत्व पटवून देण्यात आले. या कार्यक्रमात प्राचार्य डॉ.के.बी. कणकुरे व पर्यावरण विभागाचे प्रमुख डॉ.जे.एम.पटवारी यांनी आपल्या मनोगतात पर्यावरणाच्या संतुलनासाठी वृक्षांचे महत्व पटवून दिले व झाडे केवळ लावून चालणार नाहीत तर त्यांचे संगोपनही केले पाहिजे. तसेच प्लास्टीक पिशव्यांच्या वापरावरही निर्बंध आणले पाहिजे, जेणेकरून पर्यावरणाची संतुलन बिघडणार नाही असेही मत त्यांनी मांडले.

या कार्यक्रमात डॉ.तांबोळी, डॉ. दहिफळे, डॉ.आलापूरे, डॉ. नागरगोजे, डॉ.मुलगे, प्रा. अंबेरंगे व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

दि. 6-6-15.


| Sr no. 22 | **Event Name:** workshop on Snake handling | **No of Beneficiaries:** 62 | **Organizing Department:** zoology department | **Date and Duration:** 23rd September 2015 |
|---|---|---|---|---|
| **Event Objectives/ Outcomes :**<br>● a workshop on on the snake awareness and handling was organised by the department of zoology of the college<br>● the first year students of under graduation were guided on the poisonous and nonpoisonous snakes identification the resource persons also guided on the misconceptions about the snakes and the first aid on Snake bite | | | | **Chief Guest/Resource Person:**<br>Dr BS Kamble<br>Dr PS Shete |



साप हातळण्याचे सादरीकरण

उदगीर(प्रतिनिधी) महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभागा मध्ये शिक्षण घेणाऱ्या बी.एस्सी.प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना विषारी व बिनविषारी साप दाखवुन उदगीर येथील सर्प मित्र श्याम पिंपरे व प्राणिशास्त्र विभागाचे प्रा.कांबळे बी.एस.व प्रा.शेटे पी.एस.यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती व आपल्या परिसरात आढळणाऱ्या विषारी व बिनविषारी सापांची ओळख करूण देवुन सापाविषयी असलेले गैरसमज व प्रथममोपचार पद्धती सांगुन समाजामध्यें जागृजर करण्यासाठी व शेतकऱ्यांना सहकार्य करण्याचे मार्गदर्शन करण्यात आले हा मार्गदर्शनाचा कार्यक्रम घेण्यासाठी व यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.बी.कनकुरे, डॉ. एस.जी.पाटील व डॉ.जे.एस. पटवारी यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

| Sr no. 23 | Event Name: NAAC Peer team visit for Second Cycle | No of Beneficiaries: | Organizing Department: Internal Quality Assurance Cell | Date and Duration: 3 days -27September to 30 September 2015 |
|---|---|---|---|---|
| **Event Objectives/ Outcomes :**<br>● Second Cycle Assessment and Acccreditation of the College<br>● To know SWOC of the college in pursuit of excellence in imparting higher education to the college students | | | | **Peer team**<br>**DR Mrudul Hajarika, Guwahati**<br>**Dr A. Venkatraman, Surat** |




## 'उदयगिरी'स 'नॅक' पिअर टीमची भेट

उदगीर : विद्यापीठ अनुदान आयोगाच्या राष्ट्रीय मूल्यमापन आणि स्वीकृती परिषदेच्या (नॅक) पिअर टीम ची भेट महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयास दि.२८ ते ३० सप्टेंबर २०१५ रोजी होणार आहे. महाविद्यालयात ही टिम सर्व विभाग, ग्रंथालय, वसतिगृह, प्रशासकीय कामकाज, संशोधन प्रकल्पांची तपासणी करणार आहे. या कालावधीत सदर टिम माजी विद्यार्थ्यांशीही संवाद साधणार आहे. टीम मध्ये गुवाहाटी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.मृदुला हजारिका, व्हीएनएसजी विद्यापीठ सुरत येथील लोकप्रशासन विभागप्रमुख प्रा.डॉ.ए.व्यंकटरामन यांचा समावेश आहे. यासाठी सर्व तयारी पूर्ण झाल्याची माहिती प्राचार्य डॉ.के.बी. कणकुरे, नॅक समन्वयक प्रा.डॉ.एस.आर. नागोरी यांनी दिली.

29-9-15

| Sr no. 24 | **Event Name: Cleanliness drive** | **No of Beneficiaries:** 300 | **Organizing Department:** NCC | **Date and Duration:** 2nd October 2015 |
|---|---|---|---|---|
| **Event Objectives/ Outcomes :**<br>• 53 Maharashtra Battalion credits NCC unit of the college organised the cleanliness drive on the occasion of Mahatma Gandhi Jayanti and Lal Bahadur Shastri Jayanti<br>• this event also included the school students and other students of the college this cleanliness drive was an outreach activity carried out at hutatma Udyan area in Udgir city | | | | **Chief Guest/Resource Person:** commanding officer T Sambhaiya |



राष्ट्रीय छात्रसेनेच्या वतीने स्वच्छता अभियान

उदगीर वार्ता :–

येथील राष्ट्रीय छात्रसेनेच्या वतीने म.गांधी व माजी दिवंगत पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त हुतात्मा स्मारक उद्यानात परिसर स्वच्छतेची मोहीम हाती घेण्यात आली. यावेळी उदगीरातील सर्व महाविद्यालय व शाळामधील ३०० छात्रसैनिकांनी सहभाग घेतला. लेफ्टनंट प्रा. आर.जी.साबदे (महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय), लेफ्टनंट प्रा. व्ही. आय.पवार (श्री. हावगीस्वामी महाविद्यालय), फर्स्ट ऑफिसर पी.एम.नाईक (श्यामलाल स्मारक विद्यालय), सेकंड ऑफिसर व्ही.आर.रेड्डी (लालबहादुर शास्त्री विद्यालय) सेकंड ऑफिसर आर.बी.वाघ (विद्यावर्धिनी हायस्कूल), थर्ड ऑफिसर बी.डी.मुस्कावाड (राजश्री शाहु सैनिकी विद्यालय), हवालदार तानाजी जाधव, माधव गिते (लातूर), ५३ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल टी. संभय्या, प्रशासकीय अधिकारी लेफ्टनंट कर्नल बंदखेडके यांच्या मार्गदर्शनाखाली अभियान यशस्वी झाले.

उदयगिरी महाविद्यालय: येथील राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने म.गांधी व माजी दिवंगत पंतप्रधान लालबाहादुर शास्त्री यांच्या जयंती निमीत हुतात्मा स्मारक उद्यानात परिसर स्वच्छतेची मोहीम हाती घेण्यात आली यावेळी उदगीरातील सर्व महाविद्यालया व शाळामधील ३०० छात्रसैनिकांनी सहभाग घेतला लेफटनंट प्रा.आर.पी.साबदे ,लेफटनंट प्रा.व्ही.आय.पवार, फर्स्ट ऑफिसर पी.एम.नाईक,सेकंड ऑफीसर व्ही.आर.रेडी, सेकंड ऑफीसर आर.बी.वाघ, थर्डऑफीसर बी.डी.मुस्कावाड, हवलदार तानाजी जाधव, ५३ महाराष्ट्र बटालियनचे कमांडीग ऑफिसर टी. संभया,प्रशासकीय अधिकारी लफटनंट कर्नल बंदखेडके यांच्या मार्गदर्शनाखाली अभीयान यशस्वी झाले

| Sr no. 25 | Event Name: ENT poster exhibition | No of Beneficiaries: 280 | Organizing Department: national service scheme NSS | Date and Duration: 9th October to 12th October 2015 |
|---|---|---|---|---|

| Event Objectives/ Outcomes : | Chief Guest/Resource Person: |
|---|---|
| • the poster exhibition on the theme of ear nose and throat ENT theme was organised during 9th October total October 2015<br>• the aim of this exhibition was to create awareness among the students about the fitness and health and ENT | Dr Sanjay Kulkarni |



## उदयगिरीत 'रासेयो' च्या वतीने ई.एन.टी.पोस्टर प्रदर्शन

उदगीर(प्रतिनिधी) महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात, राष्ट्रीय सेवा योजनेच वतीने डॉ. संजय शेषेराव कुलकर्णी यांच्या कान, नाक,घसा यावरील पोस्टारचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. के.बी. कणकुरे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये कान,नाक,घसा या अवयवाबाबत जागृती घडवून आणण्याच्या उद्देशाने 'रासेयो' तर्फे या पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन दि. ०९ ऑक्टोबर २०१५ ते १२ ऑक्टोबर २०१५ पर्यंत सर्वांसाठी खुले राहणार आहे. याप्रसंगी डॉ. संजय कुलकर्णी, 'रासेयो' कार्यक्रमाधिकारी प्रा. मल्लेश झुंगा स्वामी, प्रा. एस.एम. सुर्यवंशी, प्रा. जी.जी. जेवळीकर, प्रा. व्ही.एस.नागपूर्णी, प्रा. बी.एस. कांबळे तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

यशवंत. दि. 11-10-15.

## उदयगिरीत रासेयो च्या वतीने ई.एन.टी. पोस्टर प्रदर्शन

उदगीर/प्रतिनिधी - उदयगिरी महाविद्यालात, राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने डॉ.संजय शेषेराव कुलकर्णी यांच्या कान, नाक, घसा यावरील पोस्टरचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ.के.बी. कणकुरे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये कान,नाक, घसा या अवयवाबाबत जागृती घडवून आणण्याच्या उद्देशाने रासेयो तर्फे या पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यातआले आहे. हे प्रदर्शन दि. ९ ऑक्टोबर २०१५ ते १२ ऑक्टोबर २०१५ पर्यंत सर्वांसाठी खुले राहणार आहे. याप्रसंगी डॉ.संजय कुलकर्णी, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.एम.बी. स्वामी, प्रा.एस.एम.सुर्यवंशी, प्रा.जी.जी. जेवळीकर, प्रा.व्ही. एस.नागपुर्णे, प्रा.बी. एस.कांबळे तसेच विद्यार्थी विद्यार्थीनी बहुसंख्येने उपस्थित होते.

दि. 13-10-15.

# ‘उदयगिरी’स मैदानी स्पर्धेत १४ पदके


लोकमत दि 16-10-15



**उदगीर :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत राजर्षि शाहू महाविद्यालय, लातूर येथे आयोजित मुले व मुलींच्या मैदानी स्पर्धेत महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाने १४ पदके पटकावली. खेळाडूंना प्रा.एस.बी. मुंडे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रमोद सुरनर ८०० मीटर धावण्यात विद्यापीठात प्रथम, १५०० मीटर धावण्यात विद्यापीठात तिसरा, २०० मीटर धावण्यात रसिका आदेप्पा विद्यापीठात तिसरी, ४ बाय ४०० मीटर रिले संघ विद्यापीठात प्रथम आला. माधव केंद्रे, जीवन गोरेवार, धोंडिबा गिर्दवाड, प्रमोद सुरनर, धम्मशील कांबळे, ४ बाय १०० मीटर रिले संघात धम्मशील कांबळे, माधव केंद्रे, विकास अंधुरे, माधव फड, प्रमोद सुरनर यांचा समावेश होता. यशाबद्दल प्राचार्य डॉ.के.बी. कणकुरे यांनी अभिनंदन केले.

लोकमत. दि. 16-10-2015.


| Sr no. 26 | **Event Name:** Felicitation of of Dr JM Patwari | **No of Beneficiaries:** 55 | **Organizing Department:** life sciences club | **Date and Duration:** 14th October 2015 |
|---|---|---|---|---|
| **Event Objectives/ Outcomes :**<br>● this felicitation program was organised for doctor gem Patwari for presenting the paper in the international seminar at Switzerland<br>● the life sciences club organised this event for which the students of Bsc and Msc where present | | | | **Chief Guest/Resource Person:** Dr R B allapure |



## डॉ.पटवारी यांचा सत्कार

उदगीर : महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ.जयप्रकाश पटवारी यांचा लाईफ सायन्स क्लबच्या वतीने डाव्होस (स्वीझर्लंड) येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय पर्यावरण चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. त्यांनी चर्चासत्रात 'वीटभट्ट्यांचा पर्यावरणावर होणारा परिणाम' या विषयावर शोधनिबंध सादर केला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.डॉ. व्ही.आर. बासवाडेकर यांनी केले. आभार प्रा.डॉ.आर.बी. आलापुरे यांनी मानले. कार्यक्रमास प्रा.डॉ.आर.आर. तांबोळी, प्रा.डॉ.बी.एम.संदीकर, प्रा.डॉ.आर.के. नारखेडे, प्रा.डॉ.पी.एस. शेटे, प्रा.डॉ.व्ही.एस. नागपुर्णे, प्रा.डॉ.एस.एन.लांडगे, प्रा.बी. एस. कांबळे यांच्यासह विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

| Sr no. 27 | **Event Name:** Book exhibition and guest lecture on on reading skillsAnd general knowledge competition | **No of Beneficiaries:** 80 | **Organizing Department:** library | **Date and Duration:** 15th October 2015 |
|---|---|---|---|---|
| **Event Objectives/ Outcomes :**<br>● on the eve of Dr APJ Abdul Kalam Jayanti the knowledge research centre of the college organised the book exhibition on the biographical books for the UG and PG students after college<br>● the general knowledge competition was organised jointly E with udaygiri Chetna Youth Group the students were given prizes | | | | **Chief Guest/Resource Person:** Police officer Aniket Bharti |



# 'उदयगिरी'त वाचन प्रेरणादिन; ग्रंथप्रदर्शन व व्याख्यान

लोकमत दि: 17-10-2015

ता.प्रतिनिधी

उदगीर : महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात भारतरत्न डॉ.ए.पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा' दिनाचे औचित्य साधून ग्रंथालयात चरित्रग्रंथाचे ग्रंथप्रदर्शन आयोजित केले होते. ग्रंथप्रदर्शनात प्रेरणादायी व चरित्रग्रंथाची मांडणी केली होती. ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन उपविभागीय पोलिस अधिकारी अनिकेत भारती यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. के. बी. कणकुरे, ग्रंथपाल प्रा.एल. बी. पेन्सलवार यांच्या उपस्थितीत झाले. सभागृहात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित व्याख्यान झाले. यावेळी प्रा.डॉ.आर.के. मस्के, प्रा. एम. बी. स्वामी, प्रा. एस. एम. सूर्यवंशी, प्रा. जी.जी. जेवळीकर, विद्यापीठ प्रतिनिधी प्रमोद सुरनर यांची उपस्थिती होती.

यावेळी उदयगिरी चेतना युवक संघातर्फे घेण्यात आलेल्या सामान्यज्ञान स्पर्धेत यशस्वी प्रथम अनिल नळगिरे, तृतीय श्रीकांत जाधव, तुकाराम देशमाने यांना रोख पारितोषिक व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. प्रतिनिधिक ग्रंथभेट नामदेव धनवे, शिवकुमार गुरूडे, गोपाळ बिरादार, रूपाली बिरादार, वर्षा कांबळे यांना देण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने स्तुत्य उपक्रम घेतल्याबद्दल डॉ. कणकुरे यांनी समाधान व्यक्त केले. भारती यांनी ग्रंथ व मित्रांच्या संगतीने जीवन घडते. वाचनाची आवड स्पर्धा परीक्षेत यश मिळवून देते. विद्यार्थी दशेत पुढे काय व्हायचे ध्येय ठरवून करिअरबाबत गंभीर होण्याची अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. मस्के यांनी केले.

यावेळी महाविद्यालयातील कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

लोकमत. दि. 17-10-2015.

लोकपूर दि. 18-10-2015

# उदयगिरीत वाचन प्रेरणादिन ग्रंथप्रदर्शन व व्याख्यानाने साजरा

उदगीर/प्रतिनिधी-

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या साधून ग्रंथालयात चरित्राग्रंथाचे ग्रंथप्रदर्शन आयोजीत केले होते. चरित्रग्रंथाचे ग्रंथप्रदर्शन आयोजित केले होते. ग्रंथप्रदर्शनात प्रेरणादायी व चरित्रग्रंथाची माडंणी केली होती. ग्रंथप्रदर्शनाचे उद्‌घाटन उपविभागीय पोलिस अधिकारी अनिकेत भारती यांच्या हस्ते, प्राचार्य डॉ.के.बी. कणकुरे, ग्रंथपाल प्रा.एल.बी. पेन्सलवार यांच्या उपस्थितीत झाले. सभागृहात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजत व्याख्यान झाले. प्रमुख पाहुणे उपविभीय पोलिस अधिकारी अनिकेत भारती होते. मंचावर प्राचार्य डॉ.के.बी. कणकुरे, प्रा.डॉ.आर.के.मस्के, रासेयो कार्यकारी अधिकारी प्रा.एम.बी.स्वामी, प्रा.एस.एस.सूर्यवंशी प्रा.जी.जी.जेवळीकर विद्यापीठी प्रतिनिधी प्रमोद सुरनर यांची उपस्थिती होती. यावेळी उदयगिरी चेतनायुवक संघात तर्फे घेण्यात आलेल्या सामान्यज्ञान स्पर्धेत यशस्वी प्रथम अनिल नळगीर तृतीय श्रीकांत जाधव, तुकाराम देशमाने यांना रोख पारितोषिक व पुष्प गुच्छ देवून शिवकुमार गुरूडे, गोपाळ बिरादार, रूपाली बिरादार, वर्षा कांबळे यांना देण्यात आली. राष्ट्रीय सेवा याजनेच्या वतीने स्तुत्य उपक्रम घेतल्याबद्दल डॉ.कणकुरे यंनी समाधान व्यक्त केले. भरती यांनी ग्रंथ व मित्रांच्या संगतीने जीवन घडते. वाचनाची आवड स्पर्धा परिक्षेत यश मिळवून देते विद्यार्थी दशेत पुढे काम व्हायचे ध्येय ठरवून करिअरबाबत गंभीर होण्याची अपेक्षा व्यक्त केली. सूत्रसंचलन प्रा.डॉ. आर.के. मस्के यांनी केले

लोकपूर दि. 18-10-2015.

| Sr no. 28 | Event Name: Gold medal in photography | No of Beneficiaries: | Organizing Department: cultural committee | Date and Duration: 20 October 2015 |
|---|---|---|---|---|
| **Event Objectives/ Outcomes :**<br>● Rohit Gilche a student of BCom 1st year backed the gold medal in in location photography at the youth festival level<br>● the student and his mentor Dr BS Bhuktare was felicitated on this occasion | | | | **Chief Guest/Resource Person:** |



लोकमत दि 22-10-15.

# युवक महोत्सवात रोहितला सुवर्णपदक

प्रतिनिधी

उदगीर : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत झालेल्या युवक महोत्सवात महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या बी.कॉम. प्रथम वर्षात शिकणाऱ्या रोहित गिलचेला स्थळ छायाचित्रण कलाप्रकरात प्रथम क्रमांकाचे सुवर्णपदक प्राप्त झाले आहे. त्यास प्रा.डॉ.बी.एस. भुक्तरे यांचे मार्गदर्शन लाभले होते. या यशाबद्दल संस्था उपाध्यक्ष प्रा. मनोहर पटवारी, सचिव ॲड.अजय दंडवते, प्राचार्य डॉ.के.बी. कणकुरे, उपप्राचार्य डॉ.एस.जी. पाटील यांनी अभिनंदन केले.

लोकमत. दि. 22-10-2015.

| Sr no. 29 | **Event Name:** felicitation off the staff on retirement | **No of Beneficiaries:** | **Organizing Department:** | **Date and Duration:** 22 October 2015 |
|---|---|---|---|---|
| **Event Objectives/ Outcomes :**<br>● professor Patil and the non teaching staff Dangur and Nagaralle were felicitated on their retirement<br>● | | | | **Chief Guest/Resource Person:**<br>Secretary Manohar Rao Patwari Sahib |



# उदयगिरीत तिघांचा सेवागौरव

प्रतिनिधी

उदगीर : महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात नियत वयोमनानुसार सेवानिवृत्त झालेल्या कर्मचारी नागराळे, डांगूर, प्रा. डॉ. पाटील यांचा सेवागौरव करून निरोप देण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर संस्था उपाध्यक्ष प्रा. मनोहर पटवारी, सचिव ॲड.अजय दंडवते, प्राचार्य डॉ. के. बी. कणकुरे, उपप्राचार्य डॉ. एस. जी. पाटील, पर्यवेक्षक प्रा. आर. एन. जाधव यांची उपस्थिती होती. तिघांचाही शाल, श्रीफळ, पुष्पहार व स्मृतिचिन्ह देवून मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

तिघेही कष्टाळू, प्रामाणिक महाविद्यालयाच्या विकासात दिलेल्या योगदानाचा प्रा. डॉ. व्ही. आर. बासवाडेकर, प्रा. डॉ. बी. एम. संदीकर, प्रा. एम. बी. स्वामी यांनी गौरव केला. डॉ. कणकुरे यांनी महाविद्यालयात विकासात तिघांच्या योगदानाबद्दल समाधान व्यक्त केले. प्रा. पटवारी यांनी महाविद्यालय लौकिकात शिक्षक व कर्मचाऱ्यांनी दिलेल्या योगदानाचा आदर्श समोर ठेवून पुढील पिढीने कार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. डॉ. आर. के. मस्के यांनी केले. एकमत दि 24-10-15

एकमत. दि. 24-10-2015.

# विविध वृत्त...




उदगीर येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात डॉ. संजय कुलकर्णी यांचा शुक्रवारी प्राचार्य डॉ. के बी. कणकुरे यांच्या हस्ते सत्कार झाला.

## उदयगिरीत मूक-बधिर विषयावर प्रदर्शन

उदगीर - शहरातील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात रासेयोच्या वतीने शुक्रवारी डॉ. संजय कुलकर्णी यांचे मूक बधीर विषयावरील तीन दिवस प्रदर्शन भरविण्यात आले होते. उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के बी. कणकुरे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रा. मल्लेश झुंगा स्वामी, प्रा. एस. एम. सूर्यवंशी, प्रा. जी. जी. जेवळीकर, प्रा. व्ही. एस. नागपुर्णे, प्रा. बी. एस. कांबळे यांची उपस्थिती होती. लोकमत - दि - 25-10-2015

लोकमत. दि. 25-10-2015

| Sr no. 30 | **Event Name:** NSS camp inaugural function | **No of Beneficiaries:** 250 | **Organizing Department:** NSS | **Date and Duration:** 24 October 2015 |
|---|---|---|---|---|
| **Event Objectives/ Outcomes :**<br>● the NSS unit of the college organised the inaugural function for the the seven days NSS camp on Youth and personalityDevelopment<br>● the resource person Dr Chauhan guided the students on the importance of English language and the success mantra for various competitive exams | | | | **Chief Guest/Resource Person:** doctor Chauhan |



सकाळ दि 26-10-15.

# विद्यार्थ्यांसाठी 'रासेयो'चे मोठे योगदान : डॉ. चव्हाण

उदगीर, ता. २५ (बातमीदार) : राष्ट्रीय सेवा योजना ही जीवनपद्धती आहे. संघटित शक्तीमुळे अनेक प्रश्न सुटू शकतात. या योजनेची तत्त्वे जीवनात अंगीकारल्यास राष्ट्राची उन्नती होईल, विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत 'रासेयो'चे विशेष योगदान आहे, असे मत जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांनी व्यक्त केले.


महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे शैक्षणिक सत्र २०१५-१६ च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. उपविभागीय पोलिस अधिकारी अनिकेत भारती, संस्थेचे सचिव ॲड. अजय दंडवते, संस्थेचे उपाध्यक्ष मनोहर पटवारी, कोषाध्यक्ष महादेव नोबदे, प्राचार्य डॉ. के. बी. कनकुरे, राम मोतीपवळे, प्रा. डॉ. स्मिता नागोरी यांची उपस्थिती होती.

डॉ. चव्हाण म्हणाले, की ग्रामीण भागातील समस्या सोडविण्यात राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान आहे. जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी इंग्रजी भाषेची आवश्यकता आहे. स्पर्धा परीक्षेसाठी सर्व साधनांची माहिती संकलित करून गटचर्चेने अभ्यास करावा. यशासाठी सातत्य, संयम, सकारात्मकता व कष्ट करण्याची तयारी आवश्यक आहे. पूर्वी झालेल्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका मार्गदर्शक ठरतील. प्रतिकूल परिस्थितीचे भांडवल न करता ज्ञानाचे भांडवल वाढविण्याची अपेक्षा व्यक्त केली. या वेळी राज्य शासनातर्फे अल्पसंख्याक आयोगाच्या वतीने महात्मा गांधी पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल डॉ. चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. जेवळीकर यांनी सूत्रसंचालन, तर आभार प्रा. एम. बी. स्वामी यांनी मानले.

उदगीर : महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण. या वेळी अनिकेत भारती, प्रा. पटवारी, डॉ. के. बी. कनकुरे, श्री. नौबदे आदी.

सकाळ. दि. 26-10-2015.

| Sr no. 31 | Event Name: Savitribai Phule Jayanti | No of Beneficiaries: | Organizing Department: day special committee | Date and Duration: January 2016 |
|---|---|---|---|---|
| **Event Objectives/ Outcomes :**<br>● the day special committee celebrated the birth anniversary of Savitribai Phule and Dr Deepak chidrawar delivered a lecture on the contribution of Savitribai Phule as a first female teacher of India<br>● | | | | **Chief Guest/Resource Person:**<br>principal |



महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती

उदगीर/प्रतिनिधी- महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ.के. बी.कणकुरे, प्रा.डॉ. आर.के. मस्के, पर्यवेक्षक, प्रा.आर.एन.जाधव, प्रा.बी.एन.गायकवाड, प्रा.डॉ.डी. आर.चिदरवार, प्रा.डॉ. जी.जी.जेवळीकर यांची उपस्थिती होती.

दि. 5-1-2016

| Sr no. 32 | **Event Name:** valedictory function of NSS camp | **No of Beneficiaries:** 140 | **Organizing Department:** NSS | **Date and Duration:** 18 January 2016 |
|---|---|---|---|---|
| **Event Objectives/ Outcomes :**<br>● according to Mr Dinkar Jagdale NSS inculcates the principle of work is worship among the students<br>● he further emphasized the contribution of the NSS in the citizen and nation building at large through its various activities the NSS volunteers will surely contribute get greatly to the local and national problems in future | | | | **Chief Guest/Resource Person:**<br>chief executive officer of Zilla Parishad Mr Dinkar Jagdale |



# रासेयो म्हणजे अनुभवातून जीवन समृध्दीची कार्यशाळा-जगदाळे

यशवंत दि. 19-1-16

उदगीर (प्रतिनिधी) माणसाचे जीवन समृध्द करण्यासाठी अनुभवाची शिदोरी महत्वाची असते. श्रम प्रतिष्ठेचा अनुभव राष्ट्रीय सेवा योजना शिबीरातून प्रगल्ळा होत असतो, त्यामुळेच या शिबीराचे अन्यन्यसाधारण महत्व आहे असे विचार लातूर जिल्हापरिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी दिनकर जगदाळे यांनी व्यक्त केले. ते महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या पर्यावरण, नैसर्गिक साधन संपत्ती व संवर्धन आणि स्वच्छ भारत अभियान विशेष युवक शिबीर कुमठा (खु) ता.उदगीर येथे उद्घाटक म्हणून बोलत होते.

या उद्घाटन सोहळयाच्या अध्यक्षपदी संस्थेचे उपाध्यक्ष तथा माजी आ. प्रा. मनोहर पटवारी हे होते.

प्रमुख पाहुणे म्हणून माजी आ. गोविंदराव केंद्रे, जि.प. चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्याम पटवारी, गटविकास अधिकारी संतोष राउत, प्राचार्य डॉ. के.बी. कणकुरे, सरपंच सौ. दिलीप भूसारे, उपसरपंच शिवाजी केंद्रे, ग्रामसेवक संजय नागरगोजे, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी प्रा. मल्लेश झुंगा स्वामी, प्रा. एस.एम. सूर्यवंशी, विद्यापीठ प्रतिनिधी प्रमोद सुरनर, युवा नेते राहूल केंद्रे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना जगदाळे यांनी सांगितले की, रासेयोचे शिबीर म्हणजे विद्यार्थी जीवनात प्रत्यक्ष कामाचा अनुभव देणारी कार्यशाळाच आहे. अशा कार्यशाळेतूनच जीवन समृध्द होवू शकेल. त्यासाठी विद्यार्थ्यांनी रासेयोच्या माध्यमातून काम करण्याची संधी म्हणजे श्रमप्रतिष्ठेचा अनुभव समजावा असे सांगितले.

माजी आ. गोविंद केंद्रे यांनी स्पष्ट केले की श्रमाचे संस्कार होण्यासाठी अशा शिबीराचे नितांत गरज आहे. स्वयंसेवकांची भूमिका बजावण्यासाठी अशा शिबीराची खूप गरज असते असे सांगितले. अध्यक्षीय समारोपातून प्रा. पटवारी यांनी सांगितले की उद्याच्या भारताचे भक्तिव्य तरुणांच्या हातात आहे. सामान्य माणूस कसा जगतो, कसे कष्ट करतो याचा प्रत्यक्ष अनुभव अशा शिबीरातूनच घेता येवू शकतो. असे अनुभव घेतांनाच उद्या समाजासमोर, देशासमोर भेडसावणारे प्रदुषण, पर्यावरण असमतोल, पाणी टंचाई, स्वच्छता अशा विषया सोबतच अंधश्रध्दा निर्मुलन यासाठी युवकांनी पुढे येवून काम करणे गरजेचे आहे. अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ. गौरव जेवळीकर यांनी केले तर आभार प्रा.डॉ. राजकुमार मस्के यांनी केले.

यशवंत. दि. 19-1-2016.

<table>
<tr><td>Sr no. 33</td><td>Event Name:<br>book festival andexhibition seminar on poetry recitation and competitions</td><td>No of Beneficiaries:<br>350</td><td>Organizing Department:<br><br>National Book Trust and Maharashtra udaygiri Mahavidyalaya Udgir</td><td>Date and Duration:<br>15 and 16 February 2016</td></tr>
<tr><td colspan="4">Event Objectives/ Outcomes :<br>● Maharashtra udaygiri Mahavidyalaya Udgir and National Book Trust jointly organised the book exhibition of today's from 15 and 16 February 2016<br><br>● various other activities like student seminars poetry recitation essay writing competitions Where are organised on this occasion</td><td>Chief Guest/Resource Person:<br>Jaydev Dole<br>dananjay gudsoorkar<br>n i Shaikh</td></tr>
</table>



# १५ व १६ रोजी ग्रंथमहोत्सवाचे उदगीरमध्ये आयोजन

प्रतिनिधी

उदगीर : माध्यमिक शिक्षा अभियान जि. प. लातूर व नॅशनल बुक ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने उदगीर येथील उदयगिरी महाविद्यालयात १५ व १६ फेब्रुवारी रोजी ग्रंथमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या ग्रंथमहोत्सवाच्या तयारीसाठी उदगीर येथे व्यापक बैठक घेण्यात आली. उपशिक्षणाधिकारी आर. एन. गारकर, एन. आय. शेख, प्रा. डॉ. राजकुमार मस्के, प्रा. मल्लेश झुंगास्वामी, विकास संदगीकर, विस्तार अधिकारी ए. आय. थोटे, एस. एस. पारसेवार, इ. उपस्थित होते.

या ग्रंथमहोत्सवात शहरातील सर्व शाळांचे विद्यार्थी वेशभूषा व विविध कलांसह ग्रंथदिडीत सहभागी होणार आहेत. दोन दिवसांच्या ग्रंथप्रदर्शन, ग्रंथविक्री, उद्घाटन, कविसंमेलन, परिसंवाद, गायनस्पर्धा इ. कार्यक्रमाचेआयोजन केले आहे.

उदगीर शहरात अशा प्रकारचा ग्रंथमहोत्सव पहिलाच होत असून यात सर्व उदगीरकर सहभागी होऊन तो यशस्वी करतील यासाठीचे नियोजन या वेळी करण्यात आले.

विस्तार अधिकारी एस. पी. शिंदाळकर, शेटे, आडे, यांच्यासह शहरातील शाळांचे मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख बैठकीस उपस्थित होते.

सूत्रसंचलन उपशिक्षणाधिकारी एन. आय. शेख यांनी तर आभार धनंजय गुडसूरकर यांनी मानले. या वेळी उपस्थितांना प्रा. मल्लेश झुंगास्वामी, गारकर यांनी मार्गदर्शन केले. 12-2-16

12-2-16.

# लोकशाहीच्या परिपक्वतेसाठी ग्रंथाची उपयुक्तता- प्रा. जयदेव डोळे

यशवंत दि. 16-2-2016.



उदगीर (प्रतिनिधी) लोकशाही प्रगल्भ, परिपक्व होण्यासाठी ग्रंथाना अनण्यसाधारण महत्व असल्याचे मत औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या व जनसंवाद विभागातील प्रा. जयदेव डोळे यांनी व्यक्त केले.

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान नॅशनल बुक ट्रस्ट व महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय याचे संयुक्त विद्यमाने लातूर 'जिल्हा परिषद अंतर्गत ग्रंथमहोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात बोलत होते. अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष सौ. प्रतिभाताई पाटील कव्हेकर होत्या. मंचावर प्रमुख पाहुणे मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष, अॅड. त्र्यंबकदास झंवर जि.प. उपाध्यक्ष अण्णासाहेब पाटील, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी दिनकर जगदाळे, कृषी व पशुसंवर्धन सभापती कल्याण पाटील, उपसभापती ज्ञानोबा गोडभरले, संस्थेचे अध्यक्ष डॉ. शिवराज नाकाडे, उपाध्यक्ष प्रा. मनोहर पटवारी, जि.प. सदस्य दिलीप पाटील नागराळकर, भाजप जि.प. गटनेते रामचंद्र तिरुके, जि.प. सदस्य सुदर्शन मुंडे, सौ. अरुणा सुरवसे, शिक्षणाधिकारी (मा.) डॉ. गणपत मोरे, शिक्षणाधिकारी (प्रा.) संजय राठोड, उदगीर गटशिक्षण अधिकारी वसंत सूर्यवंशी, जळकोट गटशिक्षण अधिकारी सी.वाय कांबळे, प्राचार्य डॉ. के.बी. कणकुरे, जिप माजी सभापती नारायणराव चाटे यांची उपस्थिती होती.

दीपप्रज्वलनाने मान्यवरांच्या हस्ते ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन झाले. प्रास्ताविकात डॉ. मोरे म्हणाले ग्रंथाच्या वाचनाने प्रगती होईल, विचाराच्या कक्षा रुंदावतील या बौध्दिक पर्वणीचा लाभ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना होण्यासाठी जिल्हा परिषदेने उदगीरात ग्रंथमहोत्सव आयोजित केला.प्राचार्य डॉ. कणकुरे म्हणाले विद्यार्थ्यांत वाचनाची गोडी निर्माण होण्यासाठी स्तुत्य उपक्रम आहे. तिरुके म्हणाले उदगीर शहरात अभूत पूर्व ग्रंथदिंडी झाली विद्यार्थ्यांना पथनाट्याच्या माध्यमातून प्रबोधन केले.

कल्याण पाटील म्हणाले ग्रंथाचा जागर ग्रामीण भागात होण्यासाठीच उदगीरात कार्यक्रम ठेवला. ग्रंथ महोत्सवातून लिहिण्याची प्रेरणा मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली. जगदाळे म्हणाले उदगीर लातूर जिल्हयाची सांस्कृतिक राजधानी आहे ग्रंथवाचनाने समाधान मिळते. प्रा. पटवारी म्हणाले वाचाल तर वाचाल हा संदेश विद्यार्थ्यांनी आत्मसात करावा. अण्णासाहेब पाटील म्हणाले ग्रंथात मौलिक ज्ञान असते. ग्रंथाच्या वाचनाने विचारात भर पडते. अॅड. झंवर म्हणाले ग्रंथ महोत्सवाच्या माध्यमातून ग्रंथाना वाचकापर्यंत जाण्याची संधी असते. संस्कसर केंद्र म्हणूनही कार्य करतात. ग्रंथाचे अवलोकन केल्याने सज्जनाची संगत व बहुजन मैत्री प्राप्त होते. डॉ. नाकाडे म्हणाले वाचक व वाचनसंस्कृति निर्माण करण्यासाठी ग्रंथमहोत्सवाचा मोलाचा वाटा आहे.

प्रा.डोळे पुढे म्हणाले स्वतंत्र्य बुध्दी व विचार देण्याचे काम ग्रंथ देतात. सत्ताधारी व साहित्यिकांनी परस्परांचा आदर करावा. ज्या समाजात लेखक, कवींची संख्या जास्त तोच समाज सहिष्णू असतो. ग्रंथ व्यवस्थे विरुध्द बंडाची प्रेरणा देतात. महाराष्ट्र एकमेव प्रांत की जो साहित्यिकांना सन्मानाचे स्थान देतो. महाराष्ट्राच्या वैभवशाली राजकीय व साहित्यिक परंपरेचा गौरव केला. समारोपात श्री. पाटील म्हणाले ग्रंथ महोत्सवाला मिळालेला प्रतिसाद पाहून उदगीरात ग्रंथ महोत्सव घेतल्याचे सार्थक झाले. विचार स्वातंत्र्यासाठी ग्रंथ मदत करतात. ग्रंथातून विचार व समाजात परिवर्तन करण्याची शक्ती आहे. जिल्हा परिषद शाळांमधून विचार रुजविण्याचे कार्य विविध उपक्रमातून करीत आहे. सूत्रसंचलन प्रा.डॉ. राजकुमार मस्के यांनी केले आभार प्रा. मल्लेश झुंगा स्वामी यांनी मानले.

यशवंत दि. 16-2-2016.

## उदगीरात ग्रंथदिंडी

उदगीर - येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व नॅशनल बुक ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्हा परिषद अंतर्गत उदगीर येथे ग्रंथमहोत्सवाचा शुभारंभ सोमवारी झाला. या निमित्त सकाळी शहरातून अभूतपूर्व अशी ग्रंथदिंडी काढण्यात आली. माय मराठीच्या गौरवार्थ निघालेला हा उत्साही उत्सव सोहळा लक्षवेधी ठरला. (वृत्त हॅलो / ३ वर)



ग्रंथमहोत्सवानिमित्त उदगीर शहरातील मुख्य रस्त्यावरुन काढण्यात आलेल्या ग्रंथदिंडीने सोमवारी शहराचे लक्ष वेधले.

**ग्रंथदिंडी : हजारो विद्यार्थ्यांचा सहभागाने शहरवासियांचे लक्ष वेधले...**

# माय मराठीच्या गौरवार्थ उदगीरात जागर



उदगीर : येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व नॅशनल बुक ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्हा परिषद अंतर्गत उदगीर येथे ग्रंथमहोत्सवाचा शुभारंभ सोमवारी झाला. या निमित्त सकाळी शहरातून अभूतपूर्व अशी ग्रंथदिंडी काढण्यात आली. माय मराठीच्या गौरवार्थ निघालेला हा उत्साही उत्सव सोहळा लक्षवेधी ठरला.

ग्रंथदिंडीचा शुभारंभ नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, पोलीस उपाधिक्षक अनिकेत भारती यांच्या उपस्थितीत जिल्हा परिषदेच्या मैदानावरुन करण्यात आला. फुलांनी सजविलेल्या पालखीत ग्रंथ ठेऊन त्याची पताका शहरभर फिरविण्यात आली. जिल्हा परिषदेच्या मैदानावरुन छत्रपती शिवाजी चौक मार्गे ही दिंडी नांदेड- बीदर मार्गावरुन उदयगिरी महाविद्यालयापर्यंत निघाली. या दिंडीत शहर व तालुक्यातील सर्व शाळेतील विद्यार्थी व शिक्षक उत्साहात सहभागी झाले होते. विविध देखावे, पथनाट्य, गीते, घोषवाक्ये, फलक, पताके, बँड पथक, लेझीम पथक यांच्या माध्यमातून वेषभूषा साकारीत ग्रंथमहोत्सवाच्या उद्देश जनमाणसांपर्यंत पोहचविण्यात आला. शेतकऱ्यांच्या आत्महत्येसारखा ज्वलंत प्रश्नही या ग्रंथदिंडीत प्रतिबिंबीत झाला. जिल्हा परिषद शिक्षक परिषदेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी नाश्ता व पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली होती.

लोकमत दि 16-2-2016
16-2-2016

लोकमत. दि. 16-2-16.

---

लोकमत दि 17-2-16

# ग्रंथ महोत्सवाचा समारोप

**ग्रंथ विक्रीस प्रतिसाद : गीतगायन, काव्य स्पर्धा**

उदगीर : येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात आयोजित ग्रंथमहोत्सवाचा मंगळवारी थाटात समारोप झाला. दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात गीतगायन स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा व बाल वाचक मेळावा घेण्यात आला. दुपारच्या सत्रात निमंत्रितांची कथाकथने झाली तर सायंकाळी या महोत्सवाचा समारोप व पारितोषिक वितरण झाले.

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, नॅशनल बुक ट्रस्ट व महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद अंतर्गत ग्रंथमहोत्सवाचा समारोप मंगळवारी झाला. अध्यक्षस्थानी जि. प. उपाध्यक्ष अण्णासाहेब पाटील होते. उपजिल्हाधिकारी डॉ. विकास खरात, पोलीस उपअधीक्षक अनिकेत भारती, संस्था उपाध्यक्ष माजी आ. प्रा. मनोहर पटवारी, जि. प. सदस्य रामचंद्र तिरुके, शिक्षणाधिकारी डॉ. गणपतराव मोरे, प्राचार्य डॉ. के. वी. कणकुरे, प्राचार्य केन्द्रीके मूर्ती व गिरी महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक शिक्षणाधिकारी डॉ. मोरे यांनी केले. महोत्सवानिमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धेचे बक्षीस वितरण झाले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. राजकुमार मस्के यांनी केले तर आभार प्रा. मल्लेश झुंगा स्वामी यांनी मानले. स्पर्धांचे परिक्षक म्हणून प्रा. डॉ. अर्चना मोरे, प्रा. एस. जी. अन्सारी व प्रा. टी. एच. अतार यांनी कार्य केले. यावेळी श्रीपाद सिमंतकर, विलास सिंदगीकर, धनंजय गुडसूरकर आदीजण उपस्थित होते.

- **काव्यवाचन (छोटा गट) :** श्वेता कसबे (प्रथम), सार्थक स्वामी (द्वितीय), प्रतिक्षा माळे (तृतीय). मोठा गट : एस.बी. गायकवाड (प्रथम), अंकुश सिंदगीकर (द्वितीय), अमित टेंभुर्णे (तृतीय).
- **वैयक्तिक गीतगायन (छोटा गट) :** श्रेया मुंडे (प्रथम), मारोती पांचाळ (द्वितीय), कश्यप अरीन अहमद देशमुख (तृतीय). मोठा गट : डी.आर. जोशी (प्रथम), प्रतिमा नवगिरे (द्वितीय), आर.पी. गायकवाड (तृतीय).
- **समूह गायन (छोटा गट) :** जि.प. शाळा वाढवणा (प्रथम), राजीव गांधी विद्यालय आनंदवाडी (द्वितीय), जि.प. शाळा एकुर्का रोड (तृतीय). मोठा गट : ज्ञानप्रकाश बालविकास केंद्र लातूर (प्रथम), जि.प. शिक्षकवृंद, औसा (द्वितीय).

लोकमत. दि. 17-2-16.

| Sr no. 34 | Event Name: Poetry recitation | No of Beneficiaries: 65 | Organizing Department: | Date and Duration: 16 February 2016 |
|---|---|---|---|---|
| **Event Objectives/ Outcomes :**<br>● the poets meeting and poetry recitation program was organised on 16 February 2016<br>● the eminent poets from the the Maharashtra state participated in this poetry recitation program | | | | **Chief Guest/Resource Person:**<br>Chandrashekhar Mal kanpate |

# विविधांगी कवितांनी रंगली काव्यसंमेलनाची मैफल...



प्रतिनिधी

उदगीर : माहेराची ओढ ते बदलता गाव अन् बदलता माणूस... अवेळी पडणारा पाऊस, दुष्काळ...मायेचा ओलावा, बापाची प्रेमछाया...अशा विविधांनी स्पर्शानि नटलेल्या कवितांनी कविसंमेलनात रंगत आणली. कवींनी आपल्या प्रतिभेद्वारे कधी शब्दांना तीर केले तर कधी त्याच शबदांची सुमने वाहत उदगीरातील संमेलनाची श्रीमंती वाढविली.

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, नॅशनल बुक ट्रस्ट व उदयगिरी महाविद्यालयातर्फे आयोजीत ग्रंथमहोत्सवात सोमवारची सायंकाळ कविसंमेलनातील काव्यतुषारांनी चिंब झाली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रबोधन साहित्य परिषदेचे अध्यक्ष धनंजय गुडसूरकर होते. शिक्षणाधिकारी डॉ.गणपत मोरे, संजयकुमार राठोड, कवी भारत सातपुते, चंद्रशेखर मलकमपट्टे, विलास सिंदगीरकर इ.ची प्रमुख उपस्थिती होती.

संमेलनाची सुरूवात प्रकाश घादगिने यांच्या कवितेने झाली. अंकुश सिंदगीरकर यांनी सुरेल स्वरात आईवर भावनात्मक कविता सादर केली. आर.पी. गायकवाड यांनी माहेरच्या नात्यांची कवितेद्वारे उत्तम गुंफन घातली. श्रोत्यांनी त्यास चांगली दाद दिली. संगिता भांडवले यांनी कुटूंबावर सादर केलेली कविताही दाद मिळवून गेली. चंद्रदीप नादरगे, प्रा.चंद्रकांत मोरे, माधव वाघमारे, बाबुराव हैद्राबादी यांनीही आपल्या उत्तम काव्यरचना तितक्याच चांगल्या शैलीतून सादर केल्या. विलास सिंदगीकर यांनी शेतकरी आत्महत्येच्या संदर्भाने सादर केलेली कविता हृदयस्पर्शी ठरली.


प्रा.रामदास केदार यांनी सादर केलेली रचनाही दाद मिळवून गेली. विवेक होळसंबरे यांनी आपल्या कवितेतून सीमावर्ती भागातील मराठी भाषकांची वेदना मांडली. प्रा.ज्ञानेश्वर हंडरगुळीकर यांची 'जगताना मरण यातना मायेच्या डोळयात...' ही काव्यरचना अप्रतिम ठरली. प्राचार्य तुकाराम हारगिले, सविता धर्माधिकारी, शिवाजी स्वामी यांच्या काव्यरचनांनीही दाद मिळविली. डॉ.संजय कुलकर्णी यांनी मुलगी पहायला गेलेल्या मुलाचे अवघडलेपण विनोदी अंगाने सादर केले.

प्रा.चंद्रशेखर मलकमपट्टे यांनी सावकारी पाश व त्यातून शेतकरी कुटूंबात चाललेली घालमेल आपल्या काव्यरचनेतून समोर आणली. भारत सातपुते यांची 'पहाटेपासून माझा गाव...' ही कविता दाद मिळवून गेली. अंबादास केदार, धनंजय गुडसूरकर यांच्या कवितांनाही चांगला प्रतिसाद मिळाला. आभार प्रा.मल्लेश झुंगा स्वामी यांनी मानले.

लोकमत दि 18-2-16

लोकमत . दि. 18-2-16.

<table>
<tr>
<td>Sr no. 35</td>
<td>Event Name:<br>Student Council inaugural function</td>
<td>No of Beneficiaries:<br>650</td>
<td>Organizing Department:<br><br>student Council</td>
<td>Date and Duration:<br>21February 2016</td>
</tr>
<tr>
<td colspan="4">Event Objectives/ Outcomes :<br>● the student Council organised the inaugural function for this academic year<br><br>● Mr Ramdas Patil was the chief guest and the eminent poet Mr Reddy mesmerized the audience with his powerful poems</td>
<td>Chief Guest/Resource Person:<br>Mr Ramdas Patil and Mr Reddy</td>
</tr>
</table>



## उदयगिरीत विद्यार्थी कल्याण मंडळाचे उद्घाटन

प्रतिनिधी

उदगीर : येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात विद्यार्थी कल्याण मंडळाचे उद्घाटन व विद्यार्थी गुणगौरव सोहळा आयोजित केला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून देगलूर नगर परिषदेचे मुख्याध्याधिकारी रामदास पाटील होते. यावेळी व्यासपीठावर संस्था उपाध्यक्ष प्रा.मनोहरराव पटवारी, ज्येष्ठ सदस्य विजयकुमार पेन्सलवार, उदयगिरी अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. के.व्ही. के. मूर्ती, प्राचार्य डॉ.के.बी. कणकुरे, विद्यापीठ प्रतिनिधी प्रमोद सुरनर, हास्यकवी श्रीरंग रेड्डी यांची उपस्थिती होती.

यावेळी रेड्डी यांनी हास्यकविता सादर करून रसिकांची मने जिंकली. यावेळी पाटील यांनी समाजात क्षमता असणाऱ्यांनाच सन्मान मिळतो. विद्यार्थ्यांना वेगळे जीवन जगण्याची धमक ठेवली पाहिजे. काय व्हायचे ध्येय ठरवून त्यानुरूप जीवनाची आखणी करावी. आवडीचे क्षेत्र निवडून योग्य मार्गदर्शनाने व्यक्तिमत्त्वाला आकार द्या असे सांगितले.

यावेळी प्रा. पटवारी यांनी विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक परीक्षेकडे वळून देशाची सेवा करावी.

शंकर बोरसे, संध्याराणी शिरोमणी, अतार तहसीन, अश्विनी स्वामी, प्रमोद सुरनर, आनंद जगताप, प्रेमकुमार गव्हाणे, शुभांगी आलमकेरे, परकोटे परविन बेगम, ज्योती करंजीकर सिद्दीकी फरहीन, सुनीता जोगदंड, जयंता जाधव, माया कांबळे, ज्ञानेश्वर सुडे, ऐश्वर्या धर्माधिकारी, हणमंत चिंचनवार, दीक्षा बिरादार, आकाश बिरादार, हाशमी सय्यद असलम, अभिलाष जळकोटे, नंदकिशोर पाटील, शीतल गोलेवाड, शीतल जाणते, संगीता कमद, गिलचे रोहित, भीमराव कांबळे या गुणवंत विद्यार्थ्यांना रोख बक्षिसे व सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले.तसेच संशोधन केंद्रातून पीएच.डी प्राप्त प्रा.व्यंकट सुर्यवंशी, अशोक केंद्रे, पवन येमेकर, अश्विन मुंडे, डी.जी. भोगे, आर.एम. मुगावे, शेख मुस्तफा, अब्दुल सत्तार यांचा सत्कार केला.

परिचय प्रा.मल्लेश झुंगास्वामी यांनी करून दिला. सूत्रसंचलन प्रा. डॉ. वंदना बासवाडेकर यांनी केले. आभार डॉ. आर. के. मस्के यांनी मानले.

| Sr no. 36 | **Event Name:** Felicitation of of merit student Jyoti karanjikar | **No of Beneficiaries:** | **Organizing Department:** department of geography | **Date and Duration:** 25 February 2016 |
|---|---|---|---|---|

| **Event Objectives/ Outcomes :** | **Chief Guest/Resource Person:** |
|---|---|
| • the principal felicitated the meritorious student Miss Jyoti karanjikar for securing the highest mark in the subject geography at university level<br>• | principal |




29/02/2016 यशवंत

महाराष्ट्र उदयगिरीची विद्यार्थींनी कु.सुचिता नागनाथ बिरादार ही भूगोल विषयात विद्यापीठातून सर्वप्रथम आली तसेच बी.ए.तृतीय वर्षात ज्योति करंजीकर हीस सर्वाधिक गुण मिळाले त्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने तिंचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य डॉ.के.बी.कणकुरे, विभागप्रमुख प्रा.डॉ. एन.पी.मानकरी तसेच प्रा. डॉ. एम.जी कुलकर्णी, प्रा. ए.ई. नागरगोजे इत्यादी मान्यवर

यशवंत · दि. 29-2-16.

| Sr no. 37 | Event Name: hemoglobin check up of girls students | No of Beneficiaries: 140 | Organizing Department: women development cell | Date and Duration: 16th March 2016 |
|---|---|---|---|---|

| Event Objectives/ Outcomes : | Chief Guest/Resource Person: |
|---|---|
| • the women development cell of the college arranged the hemoglobin checkup for the girls students of the college in total 140 girl students participated voluntarily in this check up<br><br>• the doctors advised the students on the importance of health and fitness and those with HB deficiency were provided with medicines | N V Kale<br>PG Panchal and Mr Rathore |



उदयगिरी महाविद्यालयात हिमोग्लोबीन तपासणी

उदगीर (प्रतिनिधी) महाराष्ट्र उदयगिरी विद्यालयात विद्यार्थिनींसाठी एचबी तपासणी करण्यात आली. याकामी शासकीय उपजिल्हारुग्णालयचे एन.व्ही. काळे, पी.जी. पांचाळ, बी.बी. राठोड यांनी तपासणी केली. यावेळी उपप्राचार्य डॉ. एस.जी पाटील, प्रा.एस.जी. अन्सारी, प्रा.डॉ.एस.आर.नागोरी, प्रा. डॉ.ए.पी. मोरे, प्रा.एम.जी. महाके, प्रा.डॉ.एम.एस. कप्पीकेरे, प्रा.एन.एफ कादरी, प्रा.डॉ. व्ही.आर. बासवाडेकर, व प्रा.एस.बी. येडले, पी.बी. गायकवाड यांची उपस्थिती होती.

यशवंत. दि. 18-3-16.

उदयगिरीच्या प्रा.म्हेत्रे यांना पीएच.डी प्रदान

यशवंत 18/3/16


उदगीर : महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील कन्नड विभागातील प्रा.चंद्रकांत मारोती म्हेत्रे यांना उस्मानिया विद्यापीठ, हैद्राबादने पीएच.डी पदवी प्रदान केली. त्यांनी उस्मानिया विद्यापीठातील कन्नड विभागातील डॉ.एम. लिंगप्पा गोणल यांच्या मार्गदर्शनाखाली 'पी.के. खंडोबा, जीवन आणि कार्य : एक अध्ययन' या विषयावर शोधप्रबंध सादर केला होता. या यशाबद्दल विभागप्रमुख प्रा. डॉ. रमेश मुलगे, प्राचार्य डॉ.के.बी. कणकुरे यांनी अभिनंदन केले.

उदयगिरीत हिमोग्लोबीन तपासणी

उदगीर : येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी एचबी तपासणी करण्यात आली. याकामी शासकीय उपजिल्हा रुग्णालयाचे एन.व्ही. काळे, पी.जी. पांचाळ, बी.बी. राठोड यांनी तपासणी केली. यावेळी उपप्राचार्य डॉ.एस.जी. पाटील, प्रा.एस.जी. अन्सारी, प्रा.डॉ. एस.आर. नागोरी, प्रा.डॉ.ए.पी. मोरे, प्रा.एम.जी. महाके, प्रा.डॉ.एम.एस. कप्पीकेरे, प्रा.एन.एफ. कादरी, प्रा.डॉ.व्ही. आर. बासवाडेकर, प्रा.एस.बी. येडले, पी.बी. गायकवाड इ.ची उपस्थिती होती.

लोकमत. दि. 18-3-2016

| Sr no. 38 | Event Name: National integrity in Urdu poetry a guest lecture | No of Beneficiaries: 68 | Organizing Department: staff prabodhini | Date and Duration: 10th March 2016 |
|---|---|---|---|---|
| **Event Objectives/ Outcomes :**<br>● Dr Maqbool Ahmed delivered a guest lecture on national integrity in Urdu poetry under staff prabodhini of the college<br>● he elaborated on The Originals of Urdu poetry to Persian Arabic languages and enlisted the several instances of national integrity in the poems of of Urdu | | | | **Chief Guest/Resource Person:**<br>Dr Maqbool Ahmed |



# प्रा.डॉ.मकबूल अहमद याचे उदयगिरी प्रबोधनीत व्याख्यान

उदगीर (प्रतिनिधी) महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील उर्दू विभागातील प्रा.डॉ. मकबूल अहमद यांनी उर्दू कवितेत राष्ट्रीय एकात्मता या विषयावर प्राध्यापक प्रबोधिनीत व्याख्यान दिले. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. एस.जं पाटील होते डॉ. मकबूल अहमद म्हणाले तुर्की, अरबी, फार्सीतून उर्दू भाषेची निर्मिती झाली. उर्दू कवितेत एकतेच्या, प्रखर राष्ट्रवादाच्या अनेक कविता कविनी लिहिलेल्या आहेत. कविता माणसांची मने जोडण्याचे काम करते. परस्परांच्या धर्म व संस्कृतीबद्दल आदर ठेवल्यासच एकता प्रस्थापित होईल. उर्दू कवितेने जीवनाच्या सर्व क्षेत्रांना स्पर्श केलेला आहे. सूत्रसंचलन प्रा.डॉ.बी. आर. दहीफळे यांनी केले.

यशवंत. दि. 18-3-2016




उदगीर येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात भूगोल विषयात विद्यापिठाच्या गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. के बी. कणकुरे, प्रा. डॉ. एम. पी. मानकरी, प्रा. डॉ. मुकेश कुलकर्णी आदी.

## उदयगिरी महाविद्यालयात गुणवंतांचा सत्कार

उदगीर : येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या भूगोल विभागाची विद्यार्थिनी सुचिना नागनाथराव बिरादार विद्यापीठ परिक्षेत प्रथम आली असून डॉ. वेळापूरकर सुवर्ण पदक प्राप्त केले आहे. तसेच भूगोल विषयात बी. ए. तृतीय वर्षात विद्यापीठातून सर्वाधिक गुण घेवून ज्योती भानुदास करंजीकर यांनी यश संपादीत केले आहे. या गुणवंत विद्यार्थ्यांचा शनिवारी महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. के बी. कणकुरे, विभागप्रमुख प्रा. डॉ. एम. पी. मानकरी, प्रा. डॉ. मुकेश कुलकर्णी व प्रा. ए. यु. नागरगोजे यांची प्रमुख उपस्थिती होती.

लोकमत. दि. २८-३-१६.

| Sr no. 39 | **Event Name:** budget and Income Tax 2016 guest lecture | **No of Beneficiaries:** | **Organizing Department:** | **Date and Duration:** 28 March 2016 |
|---|---|---|---|---|
| **Event Objectives/ Outcomes :**<br>● Mr Santosh Malai of faculty in the department of Economics under the staff prabodhini delivered lecture on budget and Income Tax 2016<br>● he explained in detail about the various aspects of the national budget for the year 2016 and the provisions for income tax | | | | **Chief Guest/Resource Person:** Dr Santosh Mule |



**प्रा. संतोष मुळे यांचे उदयगिरी प्रबोधिनीत व्याख्यान**

उदगीर/प्रतिनिधी- उदयगिरी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागातील प्रा.संतोष मुळे यांनी प्राध्यापक प्रबोधीनीत अर्थसंकल्प २०१६ व आयकर या विषयावर व्याख्यान दिले अध्यक्षस्थानी डॉ.के.बी. कणकुरे होते प्रा.मुळे म्हणाले पायाभूत सुविधावर लक्ष दिलेला, कृषी क्षेत्राविषयी रंगसफेदी केलेला अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्पात मध्यमवर्गावर कराचा भार वाढला आहे. आधी वित्तमंत्रालया मार्फत देण्यात येणारे अनुदान कृषी क्षेत्रासाठी तरतूद केल्याचे भासविण्यात आले ही रक्कम २०१४ एवढीच आहे. सूत्रसंचलन प्रा.डॉ.जी.जी. जेवळीकर यांनी केले आभार प्रा.डॉ.बी. आर. दहीफळे यांनी मानले.

# महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातर्फे उपप्राचार्य मणियार व पवार यांना निरोप

यशवंत दि. 28-4-16



उदगीर (प्रतिनिधी) महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागातील उपप्राचार्य प्रा. एस.एम. मणियार ग्रंथपाल परिचर आर.एम. पवार सेवानिवृत्त झाल्याबद्दल महाविद्यालयातर्फे उभयताुअंचा सेवागौरव करुन निरोप देण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्था उपाध्यक्ष प्रा. मनेघाहर पटवारी होते. मंचावर उपाध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, सचिव ॲड. अजय दंडवते, सदस्य रामचंद्रराव येरमे, प्राचार्य डॉ. के. बी. कणकुरे, पर्यवेक्षक, प्रा. आर.एन. जाधव यांची उपस्थिती होती. प्रा. मणियार यांच्या सेवेचा गौरव करुन महाविद्याधलयाच्या जडणघडणीत उभयतांच्या कार्याचा उल्लेख कऋन त्यांच्याविषयी भावना प्रा. आर.एन. जाधव, प्रा.बी. एन. गायकवाड, प्रा. एस.एम. पाटील, प्रा. जे.आर. कांदे यांनी व्यक्त केल्या. यावेळी पटवारी म्हणाले प्रा. मणियार व पवार यांचा योगदानाचा उल्लेख करुन आगामी काळातही आपण संस्था कार्यात सहभादगी होण्याचे आवाहन केले. पाटील म्हणाले दोघांच्या कार्याचा उल्लेख करुन महाविद्यालयाचा लैकिक शिक्षक व कर्मचाऱ्यांमुळे वाढल्याची भावना व्यक्त करुन भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सुत्रसंचलन प्रा. डॉ. राजकुमार मस्के यांनी केले. आभार प्रा. मल्लेश झुंगा स्वमी यांनी मानले.

यशवंत - दि. 28-4-16.

<table>
<tr>
<td>Sr no. 40</td>
<td>Event Name:<br>The birth anniversary of Dr Babasaheb Ambedkar</td>
<td>No of Beneficiaries:<br>140</td>
<td>Organizing Department:<br><br>the day special committee</td>
<td>Date and Duration:<br>27th of April 2 2016</td>
</tr>
<tr>
<td colspan="4">Event Objectives/ Outcomes :<br>● the days special committee organised the guest lecture of Mr Dinkar Jagdale on the occasion of the birth anniversary of Dr Babasaheb Ambedkar<br><br>● Mr Dinkar Jagdale elaborated on the contribution of Dr Babasaheb Ambedkar to Indian democracy economic social reforms etc</td>
<td>Chief Guest/Resource Person:<br>Mr Dinkar Jagdale</td>
</tr>
</table>



6.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समग्र देशाचे हित पाहिले

सकाळ दि 29-4-16.

## दिनकर जगदाळे यांचे उदयगिरी महाविद्यालयात व्याख्यान

उदगीर, ता. २८ (बातमीदार) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या विचार व कार्यातून सातत्याने समग्र देशाच्या हितासाठी दूरदृष्टीने निर्णय घेतले, असे मत लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिनकर जगदाळे यांनी व्यक्त केले.

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांचे व्याख्यान झाले. संस्थेचे सचिव ॲड. अजय दंडवते अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी शाम पटवारी, गटविकास अधिकारी संतोष राऊत, प्राचार्य डॉ. के. बी. कनकुरे, उपप्राचार्य डॉ. एस. जी. पाटील, प्रा. आर. एन. जाधव, पर्यवेक्षक प्रा. एस. एम. पाटील आदी उपस्थित होते.

श्री. जगदाळे म्हणाले, की डॉ. आंबेडकरांनी विसाव्या शतकात समाजपरिवर्तनाचे क्रांतिकारी विचार मांडले. जलधोरण ठरवून पाणी वाटपाचे अंतिम अधिकार केंद्र शासनाकडे ठेवले. स्त्री-पुरुष समान वेतनाचा आग्रह धरून सार्वजनिक मोफत शिक्षणाचा विचार त्यांनी मांडला. विद्यार्थ्यांकडून रचनात्मक कार्याची अपेक्षा ठेवली. महिला विकासावरच समाजाचा विकास अवलंबून असल्याचे सांगितले. आजच्या युवापिढीने डॉ. आंबेडकरांचे विचार आचरणात आणण्याची गरज असल्याचे मत श्री. जगदाळे यांनी व्यक्त केले.

या वेळी प्राचार्य डॉ. कनकुरे यांनीही मार्गदर्शन केले. श्री. जगदाळे यांना आयएएसचा दर्जा मिळाल्याबद्दल, तसेच माजी विद्यार्थी पटवारी यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. डॉ. राजकुमार मस्के यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. मल्लेश झुंगा स्वामी यांनी आभार मानले.

उदगीर : येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मुख्य कार्यकारी अधिकारी दिनकर जगदाळे यांचे व्याख्यान झाले. या वेळी अजय दंडवते, श्याम पटवारी, गटविकास अधिकारी संतोष राऊत, प्राचार्य डॉ. के. बी. कनकुरे आदी.

सकाळ. दि. 29-4-16.

| Sr no. 41 | Event Name: School students visit to life Sciences Laboratories | No of Beneficiaries: 180 | Organizing Department: department of Botany | Date and Duration: 5th May 2016 |
|---|---|---|---|---|
| **Event Objectives/ Outcomes :**<br>● the school students as a part of educational and Science tour to our college visited the Laboratories of Botany and zoology department<br>● Dr Rahul allapure guided the students on various scientific experiments and the importance of the study of biology | | | | **Chief Guest/Resource Person:**<br>Dr Rahul Allapure |



# मानवकल्याणासाठी सुक्ष्म जीवशास्त्राच्या सखोल अभ्यासाची गरज- प्रा.डॉ.अल्लापूरे


उदगीर/प्रतिनिधी

गेल्या शेकडो वर्षांपासून प्राणीशास्त्र व वनस्पतीशास्त्राचा अभ्यास जगभरातील शास्त्रज्ञ करीत आहेत परंतु करोडो विषाणूंच्या अभ्यासातीचा जगाचा वेग अत्यंत कमी आहे. त्यामुळेच जगाला रोज नव्या नव्या आजाराला सामोरे जावे लागत आहे. मानवी जीवनाला निरोगी बनविण्यासाठी सुक्ष्म जीवशास्त्राच्या सखोल आणि गतीमान अभ्यासाची गरज आहे असे मत उदयगिरी महाविद्यालयाचे प्राणीशास्त्राचे विभागप्रमुख प्रा.डॉ.राहूल अल्लापूरे यांनी उदयगिरी अकॅडमीतील विज्ञान सहलीसाठी आलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले.

विद्यार्थ्यांच्या परिपूर्ण विकासासाठी धडपडणारे अग्रगन्य नामांकीत शैक्षणिक संकुल उदयगिरी अकॅडमीतील इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांनी प्रयोगातून विज्ञान शिकण्यासाठी व अनुभवण्यासाठी महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय उदगीर येथील प्राणीशास्त्र व वनस्पतीशास्त्र विभागाला भेट दिली. अनेक प्रयोग त्यांना डॉ.राहूल अल्लापूरे यांनी करून दाखविले. उदयगिरी अकॅडमीचे संचालक प्रा.गोपाळकृष्ण घोडके यांनी विज्ञानाच्या अभ्यासासाठी प्रयोगाचे महत्व समजावून सांगितले.

उदयगिरी अकॅडमीतील शैक्षणिक विज्ञान सहलीच्या आयोजनासाठी संचालक प्रा.गोपाळकृष्ण घोडके,व्यवस्थापक प्रा.संतोष पाटील,मार्गदर्शक प्रा.श्रीमन रेड्डी, प्रा.सौ.ज्योती खिंडे,प्रा.सौ.मिना हुरदळे,प्रा.सौ.प्रेरणा गवळी,प्रा.सौ.सरस्वती कवठाळे-घाळे यांच्यासह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

| Sr no. 42 | **Event Name:** Mahatma basweshwar and his contribution a guest lecture | **No of Beneficiaries:** 230 | **Organizing Department:** the day special committee | **Date and Duration:** 4th May 2016 |
|---|---|---|---|---|
| **Event Objectives/ Outcomes :**<br>● Mr Shivanand haibatpure the eminent orator and social reformer delivered a guest lecture on Mahatma basweshwar and his contribution to the society on the occasion of the birth anniversary of Mahatma basweshwar<br>● the teaching and non teaching staff and students where present for this guest lecture | | | | **Chief Guest/Resource Person:** Mr Shivanand haibatpure a |



## उदयगिरी महाविद्यालयात अ‍ॅड. हैबतपुरे यांचे व्याख्यान

उदगीर : महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात प्राध्यापक प्रबोधिनीत बसव कथाकार अ‍ॅड.शिवानंद हैबतपुरे यांचे 'म.बसवेश्वर जीवन व कार्य' या विषयावर व्याख्यान झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ.एस.जी. पाटील हे होते. पुढे बोलताना अ‍ॅड.हैबतपुरे यांनी महामानव जीवन पध्दती व नीतिमूल्ये देतात लोक त्यास धर्म म्हणतात. म.बसवेश्वर स्त्री–पुरुष समनतेसाठी कार्य केले. आनंदाने जगायचे तर सदाचारानेच वागावे लागेल. म. बसवेश्वरांनी अंधश्रध्देला विरोध, मूर्तीपूजा अमान्य, एकेश्वरवादा, कष्टकऱ्याला न्याय, श्रमाला प्रतिष्ठा दिली. जगाला अनुभव मंडप, इष्टलिंग, वचनसाहित्य दिले. अनुभव मंटप संवाद व परिवर्तनाचे केंद्र होते. चोरी करू नये, हिंसा करू नये, खोटे बोलू नये, रागावू नये, इतरांना त्रास होईल असे वागू नये, अहंकार नको, दुसऱ्याची निंदा करू नये, वचन साहित्यातून समाजाला दिशा दिली. आंतरजातीय विवाहासाठी आपल्या पदाचा त्याग केला. शुद्रांना धर्मगुरूपदी बसविले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.डॉ.बी.आर. दहीफळे यांनी मानले.

5-5-16

लोकमत. दि. 5-5-2016.

| Sr no. 43 | Event Name: Elocution competition for a cleanliness drive | No of Beneficiaries: | Organizing Department: Jila Parishad Latur | Date and Duration: 5 January 2016 |
|---|---|---|---|---|
| **Event Objectives/ Outcomes :**<br>• Aakash dongapure the student of Maharashtra Degree College got the first prize in the elocution competition organised for the cleanliness drive by Jila Parishad Latur<br>• | | | | **Chief Guest/Resource Person:**<br>principal |

## जिल्हास्तरीय स्वच्छतामित्र वक्तृत्व स्पर्धेत उदयगिरीचे सुयश


यशवंत दि 7-1-16



**उदगीर (प्रतिनिधी)** जिल्हा परिषद लातूरच्या वतीने घेण्यात आलेल्या स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धेत कनिष्ठ महाविद्यालय गटातून महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे आकाश डोणगापूरे प्रथम ११००० रु. रोख, स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र, द्वितीय संकेत कुटेमाटे द्वितीय ७०००रु. रोख स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र देवून सन्मानित करण्यात आले. औरंगाबाद येथे होणाऱ्या राज्यस्तरीय फेरीसाठी आकाश डोणगापूरे यांची निवड झाली. विद्यार्थ्यांना प्रा. जे.आर.कांदे, प्रा. प्रवीण जाहुरे यांचे मार्गदर्शन लाभले यशाबद्दल प्राचार्य डॉ. के.बी. कणकुरे, उपप्राचार्य एस.एम. मनियार, पर्यवेक्षक प्रा. आर.एन. जाधव, प्रा. डॉ. आर.के. मस्के, प्रा. बी.एन. गायकवाड, प्रा.डॉ. डी.आर. चिद्दरवार, प्रा.डॉ. जी.जी. जेवळीकर यांनी अभिनंदन केले.

यशवंत दि. 7-1-16.

| Sr no. 44 | Event Name: blood donation camp | No of Beneficiaries: 42 | Organizing Department: NSS | Date and Duration: 15 January 2016 |
|---|---|---|---|---|
| **Event Objectives/ Outcomes :**<br>● the NSS unit of the college arranged jointly E with Lions Club Hospital a blood donation camp for the volunteers<br>● 42 students donated their blood in this camp the doctors also guided the students on the significance of health and fitness | | | | **Chief Guest/Resource Person:**<br>Lions Club Hospital doctors |



'उदयगिरी'त रक्तदान

उदगीर - येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात गुरुवारी रासेयो विभागाच्या वतीने रक्तदान शिबिर घेण्यात आले. यावेळी ४२ जणांनी रक्तदान केले. कार्यक्रमासाठी प्रा. मनोहर पटवारी, प्रा. डॉ. एस. जी. पाटील, प्रा. एस. एम. सूर्यवंशी, प्रा. मल्लेश झुंगा स्वामी, प्रा. डॉ. राजकुमार मस्केंनी पुढाकार घेतला.

लोकमत. दि. 16-1-2016.

# प्रा. चव्हाण सेट परीक्षा पास



वार्ताहर

**इस्मालपूर :** महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातून इतिहास विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर एम.फिल, पीएच.डी, एम.एड करून अधिव्याख्याता म्हणून कार्यरत असताना महाराष्ट्र राज्य पात्रता परीक्षा २०१५ ची सेट परीक्षा पास झाले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल भीमराव मसुरे, कुलकर्णी दिलीप, बेंबडे लक्ष्मण, पत्की इ.नी अभिनंदन केले.

ऐकमत दि 18-1-16

ऐकमत. दि. 18-1-16

*Maharashtra Education Society's*

**Maharashtra Udayagiri Mahavidyalaya, Udgir**

## Declaration

**I hereby certify that the data included in this PDF File are true to the best of my knowledge. This file is prepared by the institution after internal discussions, and no part thereof has been outsourced. I am aware that the Peer Team and the DVV Partners of NAAC will validate the information provided . Hence, this declaration.**

M.U. Mahavidyalaya Internal Quality Assurance Cell Udgir-413517 Dist. Latur

SEAL

Co-ordinator
IQAC Committee
M.U.Mahavidyalaya,
Udgir-413517 Dist. Latur

**Dr. Kamlakar Gavane**
**IQAC Coordinator**
**Maharashtra Udayagiri Mahavidyalaya**
**Udgir.**

In-Charge Principal
M.U.Mahavidyalaya
UDGIR Dist.Latur

**Dr R. R. Tamboli**
**Principal**
**Maharashtra Udayagiri Mahavidyalaya**
**Udgir**